विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००८ |
| वर्ष | : | नववे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२८**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष नववे / अंक ४ / एप्रिल २००८

## संपादकीय
## संत साहित्यातील ज्ञानदीप

इ.स. २००८ हे वर्ष समर्थ रामदासांच्या जन्माचे चारशेवे वर्ष आहे. सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात एकाचवेळी तीन चमत्कार नांदले. हे तीन चमत्कार म्हणजे शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज आणि स्वामी समर्थ रामदास हे होत.

सतराव्या शतकातील भारतीय समाज विलक्षण विस्कळीत होता. 'मतामतांचा गलबला कोणी ना पुसे कोणाला ।' अशी अवस्था होती. आसेतुहिमाचल प्रवास करून समर्थांना समाजाचे जे दर्शन झाले त्या पार्श्वभूमीवर त्यांचे साहित्य समजावून घेतले तर त्यांचे वेगळेपण लक्षात येते. त्यांचे विचार काळाच्या पुढे धावणारे होते. म्हणूनच आज जे जे विषय मोठ्या प्रमाणात अभ्यासले जातात, त्यांचे बीजरूप चिंतन समर्थांच्या साहित्यात आढळते.

समर्थांची शैली परखड, विचारप्रवृत्त आणि अंतर्मुख करणारी आहे. त्यांचे समाजाचे प्रेम ही आतून आलेली भावना आहे. म्हणून समाज संघटनेचे विचार ते व्यक्त करतात ते अनुभवाच्या अधिष्ठानावर प्रयत्न श्रेष्ठ की, प्रारब्ध श्रेष्ठ या विषयावर पूर्ण ओवी शतक त्यांनी लिहिले; आणि प्रारब्ध ही आळशी माणसांची तोंड लपवण्याची जागा आहे. हे खणखणीतपणे सांगितले. एकदा असे तोंड लपण्याची सवय लागली की आत्मपरीक्षण करणे माणूस टाळतो.

अचूक यत्न करवेना । म्हणौनि केले ते सजेना
आपुला अवगुण जाणवेना । काही केल्या

नियोजनपूर्वक कष्ट करणारा कधी अयशस्वी होत नाही, असे सांगताना समर्थ म्हणतात.

'आधी कष्ट मग फळ । कष्टचि नाही ते निर्फळ'

समर्थांचे साहित्य ही अशी समर्थ संजीवनी आहे, कारण ते कर्मातून व्यक्त झाले आहे. विज्ञानात ज्याप्रमाणे प्रयोगशील मन असावे लागते, त्याप्रमाणे कर्म करतांना, धर्म विचारांचा पुरस्कार करणाऱ्या समर्थांच्या साहित्याला विवेक, वैराग्य, प्रयत्न, प्रत्यय आणि प्रबोध या पाच तत्त्वांचे अधिष्ठान आहे.


समर्थांनी ज्या विषयांवर चिंतन करून लेखन केले त्यांची यादी फार प्रदीर्घ आहे. मानसशास्त्र, व्यवस्थापन शास्त्र, (देहबोली, विज्ञान इ. अनेक आधुनिक मानण्यात येणाऱ्या विषयांबाबतचे मूलभूत चिंतन समर्थांनी केले होते. त्यांचे वैशिष्ट्य असे की हे चिंतन त्यांच्याबरोबर संपले नाही; तर शब्दाच्या रूपात पुढीलांसाठी 'अक्षर' झाले. समर्थांचा अंतसमय आला. शिष्य शोकमग्न झाले; तेव्हा समर्थांनी सांगितले,

(पृष्ठ क्रमांक ३४ वर)

# डॉ. वा. ना. बेडेकर जीवनपट

| | |
|---|---|
| २०/२/१९१७ | गोवळ (जि. रत्नागिरी, तालुका राजापूर) येथे जन्म (शनिवार व महाशिवरात्र होती.) |
| १९३६ | मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण |
| १९४१ | एल्. सी. पी. एस्. ही वैद्यकीय पदवी (सुवर्णपदकासह) मिळाली. |
| १९४२-४३ | डहाणू, उंबरगाव येथे वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ |
| १९४४ | विवाह. याच वर्षी विलेपार्ले येथे व्यवसाय |
| १९४५ | ठाण्यात नौपाड्यात दवाखाना सुरू झाला. याच वर्षी शैला बेडेकर यांचा जन्म (१३नोव्हें.) |
| १९४७ | डॉ. विजय बेडेकर यांचा जन्म (९ ऑक्टोबर) |
| १९४९ | सौ. माणिक (बापट) यांचा जन्म (२६ मे) |
| १९५० | सध्याचे हॉस्पिटल. नारायण भुवनच्या तळमजल्याचे बांधकाम |
| १९५२-५३ | उत्कर्ष मंडळाची स्थापना |
| १९५७ | विद्याप्रसारक मंडळाच्या पुनर्रचित कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. बेडेकर विद्यामंदिर (प्राथ. विभाग) प्रारंभ |
| १९५९ | शाळेचा माध्यमिक विभाग चालू झाला. |
| १९६२ | लोकसभेची निवडणूक लढविली. |
| १९६९ | कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाची स्थापना |
| १९७२ | टी.एम.सी. विधी महाविद्यालयाची स्थापना |
| १९७३ | व्यवस्थापन विभागाची सुरुवात |
| १९७५ | विज्ञान महाविद्यालयाचे विभक्तीकरण |
| १९७६ | सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरुवात |
| १९७९ | भारत सहकारी बँकेची स्थापना (२९ एप्रिल) |
| १९८३ | विद्याप्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन सुरू झाले |
| १९९९-२००० | बांदोडकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २०००-२००१ | जोशी-बेडेकर महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे वर्ग सुरू |
| २००४ | सत्कर्म प्रतिष्ठानाची स्थापना |
| २००४ | देहावसान (१४ एप्रिल दुपारी २.२० च्या सुमारास) |

(संकलन श्री. शरद लळित)




**वर्ष नववे / अंक ४ / एप्रिल २००८**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा.. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक १०वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एक दिवस - आजी - आजोबांचा | सौ. प्रिती कुलकर्णी | ३ |
| २) | शिक्षण पत्रिकेच्या नजरेतून शिक्षक | सौ. रोहिणी रसाळ | ६ |
| ३) | श्री संतचोखामेळा (लेखांक दुसरा) | श्री. शं. बा. मठ | १९ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| ५) | दामले सर | डॉ. प्रदिप कर्णिक | ३१ |
| ६) | ग्रंथकल्याणी | श्री. शरद जोशी | ३५ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान विधी व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपर्क
संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.४०० ६०२**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी कळवावा.

# एक दिवस : आजी - आजोबांचा

*आमच्या ए. के. जोशी विद्यालयातील दोन वेगळ्या उपक्रमांवरील हे छोटे लेख आहेत. उपक्रमशीलता व उपक्रमांतील नावीन्य हा आमच्या संस्थेचा खास प्रयत्न असतो- संपादक*

आजच्या या गतिमान युगात घरातील सर्वांचेच आयुष्य धकाधकीचे झाले आहे. मुलांची शाळा, क्लास म्हणून धावपळ, आई वडिलांची नोकरी म्हणून पळापळ तर घरातील जेष्ठांची या सर्वांच्या वेळा सांभाळताना होणारी दमछाक ! एकूणच काय सगळेच बिझी. आई - वडिल नोकरीच्या निमित्ताने दिवसभर बाहेर असल्याने घरातील मुलांची जबाबदारी अर्थातच आजी - आजोबांवर येते. खरं तर, या वयात त्यांनी आराम करावा, असं सर्वांनाच वाटत असतं. वानप्रस्थाश्रमाकडे झुकणाऱ्या शरीराला आरामाची गरज असतेच, पण बदलत्या काळाप्रमाणे यात आमूलाग्र बदल झालेला दिसतो.

म्हणूनच आजी - आजोबांना त्यांच्या रूटीनमधून एक दिवस शाळेत बोलवावे, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी; या विचारातून 'आजी - आजोबांचा दिवस' साजरा करण्याचे ठरले. गेली ३ वर्षे हा दिवस आम्ही साजरा करत आहोत. हा दिवस या वर्षी २० डिसे. २००७ रोजी बेडेकर शाळेच्या प्रांगणात पार पडला.

सुरूवातीला मुलांबरोबर याची थोडी कल्पना सर्वांना देण्यात आली. या वर्षी या कार्यक्रमात एक बदल केला तो म्हणजे दोनही आजी - आजोबांना (म्हणजे आईकडचे - वडिलांकडचे) रीतसर आमंत्रण पाठवले. मुलांकडून त्यांचे फोटो मागवले होते, फोटो कार्डबोर्डवर चिकटवून बाजूने सजवून त्यांची फोटोफ्रेम मुलांकडून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करून घेण्यात आली.

२० डिसेंबरला सकाळी ९.३० च्या सुमारास आजी - आजोबांच्या आगमनाला सुरुवात झाली. सुवासिक अत्तर लावून तसेच नातवंडांनी केलेल्या फ्रेम देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. हातातील फ्रेमकडे कौतुकाने बघणारे आजी - आजोबा ही आगळी वेगळी भेट बघून धन्य झाल्यासारखे वाटत होते. शहनाईच्या मंजुळ स्वरात आजी - आजोबा इतर समवयस्कांशी हितगुज करत होते.

या श्रोत्यांसाठी एका खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सर्वप्रथम शाळेतील गायन शिक्षिका सौ. वीणा जोशी यांच्या सुमधुर गाण्याने कार्यक्रमाची सुरेल सुरुवात झाली. के. जी. विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. मेघना मुळगुंद यांनी आजी - आजोबांचे नातवंडांच्या आयुष्यात किती महत्त्व आहे हे छोट्याशा गोष्टीतून सांगितले. आजी - आजोबांशिवाय नातवंड सुकलेल्या फुलाप्रमाणे असतात, असे त्यांनी आपल्या प्रास्तविकात म्हटले.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून श्री. श्रीराम बोरकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी 'महाभारत' ह्या अजरामर ग्रंथाचा अभ्यास केला आहे, आणि अनेक खंडातील हा ग्रंथ सारांश रूपात पुस्तकरूपाने वाचकांना उपलब्ध करून दिला आहे.

सौ. वैशाली बोरकर व सौ. विशाखा देशपांडे या दोघींनी बोरकर आजोबांशी मनमोकळ्या मारलेल्या गप्पांतून त्यांची या विषयावरील मते जाणून घेतली. 'महाभारत' हे काव्य अजरामर का याबाबत बोरकर म्हणाले, की आज अनेक युगे सरली तरी त्याची महती तेवढीच आहे. याचे प्रमुख कारण की, यात माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या प्रसंगात त्याने कसे वागावे याबद्दल या

महाग्रंथात मार्गदर्शन केलेले आहे. बोरकरांची सहजसुंदर भाषाशैली वाचकांपर्यंत पोचावी. म्हणून पुस्तकातील काही उतारे वाचून दाखवण्यात आले.




**सौ. आनंदी बाई इंग्रजी माध्यम शाळेतील आजी - आजोबा दिवस**

सध्याच्या या युगात सर्व आजी - आजोबांनी कुटुंबाशी कसे संबंध ठेवावेत ? या प्रश्नाला अतिशय मोजक्या शब्दांत पण अचूक उत्तर बोरकरांनी दिले. सगळ्या प्रपंचांत असूनही नसल्याप्रमाणे कमळाच्या पानाप्रमाणे असावे; आवश्यकता असली तर तरुणांना सल्ला, मार्गदर्शन करावे अशा प्रकारची वागणूक जेष्ठांची असावी. तर तरुणांनी जेष्ठांच्या अनुभवांचा जास्तीत जास्त फायदा उठवावा. त्यांच्या वयाचा मान ठेवून नम्रपणे त्यांच्याशी संभाषण करावे, असा प्रेमळ सल्ला बोरकर आजोबांनी सर्वांना दिला.

ऐन रंगात आलेला कार्यक्रम खूप लवकर संपला असं श्रोत्यांना वाटलं. साबुदाणा खिचडी, नारळ वडी आणि कॉफी असा अल्पोपहार या सर्वांसाठी ठेवण्यात आला होता.

सर्व आजी - आजोबांच्या वतीने श्री. नाईक यांनी आपली प्रतिक्रिया मोजक्या शब्दांत मांडली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव दिसत होते. कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अनेक जेष्ठांनी शाळेला धन्यवाद दिले. चर्चात्मक कार्यक्रम आवडल्याच्या अनेक प्रतिक्रियासुद्धा ऐकायला मिळाल्या.

आपल्यासाठी आयोजित केलेल्या या 'खास' कार्यक्रमाचा सर्व आजी - आजोबांनी मनमुराद आनंद लुटला.

•••

## मुक्काम पोस्ट - शाळा

आमच्या शाळेत वर्षभर अनेक नवनवीन उपक्रम राबवले जातात. सर्वजण उत्साहाने साजरे करत असतो. असाच एक उपक्रम म्हणजे सीनीयर के. जी. च्या मुलांनी एक रात्र शाळेत रहाण्याचा. शनिवार संध्याकाळ ते रविवार सकाळ एवढा वेळ मुले शाळेतच रहातात. शिक्षक, मित्र, मैत्रिणी यांच्याबरोबर रहाण्याची, मजा करण्याची एक संधी मुलांना मिळते. मुलांमध्ये स्वावलंबनाची सवय रुजावी आई - वडिलांशिवाय रहाण्याचा एक अनुभव त्यांना मिळावा या उद्देशाने हा उपक्रम चालू केला गेला. गेली ४-५ वर्षे हा कार्यक्रम शाळेत चालू आहे.

या वर्षी १२ जानेवारीच्या शनिवारी संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मुले शाळेत आली. चादर, नाईट ड्रेस, ब्रश अशा वस्तूंनी भरलेल्या छोट्या पण त्यांच्या मानाने जड अशा बॅगा सावरत मुलं आली. पालकांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आणि मुलांच्या चेहऱ्यावर कमालीची उत्सुकता अशा विरोधी भावना आम्ही अनुभवल्या.

सर्व मुलांनी आपापल्या वर्गात सामान ठेवले. गप्पा, गाणी, गोष्टी करण्यात मुलं दंग झाली होती. नंतर मुलांना हॉलमध्ये नेण्यात आलं. सर्व शिक्षकांनी मुलांच्या करमणुकीसाठी दोन गोष्टी पपेट शो द्वारा सादर केल्या. एका गोष्टीतून मुलांना चांगल्या सवयीबद्दल सांगण्यात

आलं. तर एक प्राण्यांची गोष्ट सर्व शिक्षिकांनी सांगितली. मुलांनी पपेट शो चा आनंद घेतला.

नंतर मुले विद्यालंकार हॉलमधे गेली. मुलांसाठी छान अंगत-पंगत मांडण्यात आली होती. पावभाजी व गुलाबजाम असा मुलांचा आवडता बेत होता. मुलांनी या भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर त्यांना मैदानात नेण्यात आलं. मैदानावर शेकोटी केली होती. शेकोटीभोवती मोठा फेर धरून मुलांनी गाणी म्हटली. थोडा वेळ मैदानातच खेळल्यावर सर्व मुले परत आपापल्या वर्गात परत गेली.

सर्व वर्गात झोपण्याची तयारी चालू झाली. मुलांनी नाईट ड्रेस घालायला सुरूवात केली. मित्र - मैत्रिणींच्या मदतीने सर्वांचे नाईट ड्रेस चढले. त्यांनी आणलेल्या चादरी वगैरे शिक्षिकांच्या मदतीने घातल्या गेल्या. पांघरूणे घेऊन मुलं गुडुप झोपली.



**शाळा मुक्कामी एक रात्र**

सकाळी एका हाकेतच सगळी मुलं पटापट उठली सुद्धा ! ब्रश करुन आपापली अंथरुणे आवरून ताजी तवानी झाली. नंतर बोर्नव्हिटा घातलेले दूध सर्वांनी घेतले. आपापले सामान बॅगेत भरुन घरी जायची तयारी चालू झाली.

सगळे पालक आतुरतेने मुलांची वाट बघत होते. आपापल्या सामानाच्या बॅगा सांभाळत आई - बाबांना बघून मुलांच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर दिसत होती. शाळेतील रात्रीचा मुक्काम मुलांनी चांगलाच अनुभवला होता. त्याचा पुरेपूर आनंद लुटला होता !!

**सौ. प्रिती कुलकर्णी**
शिक्षिका, सौ. ए. के. जोशी,
पूर्व प्राथमिक विभाग.

•••

तरुणांमधील वाढती व्यसनाधीनता हा दिवसेंदिवस चिंतेचा विषय बनला आहे. अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांना हे पदार्थ सहजा सहजी उपलब्ध न झाल्यास, त्यासाठी ते अन्य मार्गाचा अवलंब करतात. चोरट्या मार्गाने होणाऱ्या अमली पदार्थांच्या व्यापारात अफूचाही समावेश आहे. अफगाणिस्तानात तयार होणारी अफू अन्य देशांकडे भारताच्या माध्यमातूनच पाठवली जाते. तरुण पिढीला बरबाद करणाऱ्या अफूच्या व्यापारावर वेळीच निर्बंध घालायला हवेत.

एखादी गोष्ट काळजाला लावून घ्यायचीच, असं ठरवलं असेल तर ती सोडून देणं शक्य नाही. एखादी गोष्ट सोडून द्यायची असेल तर त्यासाठी मनापासून तयारी असायला हवी. हे सोडून देणंही स्वेच्छेने आणि प्रसन्नतेने व्हायला हवं. तो जुलमाचा रामराम असता कामा नये. आयुष्यात अनेक गोष्टी आपल्या मनासारख्या होत नाहीत, तशा त्या व्हाव्यात असा नियमही नाही. त्यामुळे, त्या सोडून देता आल्या तर आयुष्य कितीतरी सुखाचं होईल.

# शिक्षण पत्रिकेच्या नजरेतून शिक्षक

*शिक्षण पत्रिकेच्या ७५ वर्षांच्या वाटचालीला 'शिक्षक' या विषयासंबंधात आलेले लेख वाचून बनवलेला हा शोधनिबंध. ठाण्यातील नोव्हेंबर मधे झालेल्या बालशिक्षण परिषदेतील हा महत्त्वाचा निबंध. परिषदेच्या कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे लेख उपलब्ध होऊ शकला, त्यांचे खास आभार - संपादक*

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे हे १३ वे अधिवेशन. १९९६ साली राज्यस्तरीय बालशिक्षण समिती स्थापन झाली. त्यात राज्यात बालशिक्षणासंबंधी सर्वस्पर्शी धोरण असावे अशी एक मागणी होती. शासनाचे दरवाजे अनेकदा ठोठावूनही बालशिक्षणाकडे म्हणावे तसे लक्ष पुरवले गेलेले नाही. त्यामुळे महत्त्वाचे असूनही बालशिक्षणाचे क्षेत्र दुर्लक्षित, विस्कळीत, अशास्त्रीय आणि असुरक्षित राहिले आहे. आज महाराष्ट्रात बालशिक्षणाचा भौगोलिक आणि सामाजिक विस्तार झाला हे खरे असले तरी, अजूनही त्याला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली नाही.

बालशिक्षणाचा प्रसार होण्यासाठी ते प्रभावी असणे फार गरजेचे आहे. तरच पालकांना त्याचे महत्त्व पटेल. त्यासाठी बालक आणि पालकांना आकर्षित करून घेणारे उपक्रम, योजना, साधने, खेळ यांची सुयोग्य आखणी होणे महत्त्वाचे आहे. बालशिक्षण अनौपचारिक पद्धतीने झाल्यास ते अधिक आनंददायी होणार आहे. त्यासाठी प्रभावी प्रशिक्षित शिक्षिकेची भूमिका अनन्यसाधारण आहे. म्हणूनच अधिवेशनाचा विषय 'प्रभावी बालशिक्षणासाठी प्रभावी शिक्षक' असा आहे.

भारतात बालशिक्षणाला १९१५ च्या आसपास सुरुवात झाली. मॉन्टेसरी बाईंच्या नवविचारांचे स्वागत करुन त्यावर आधारित बालशिक्षणाचे प्रयोग करणारा प्रयोगशील विचारवंतांचा छोटा वर्ग तयार झाला. श्री. गिजुभाई बधेका हे त्यातीलच एक. त्यांच्या पाठोपाठ श्रीमती ताराबाई मोडक यांनीही स्वत:ला बालशिक्षणात झोकून दिले. मॉन्टेसरी पध्दतीच्या मंत्र आणि तंत्राच्या प्रसारासाठी त्यांनी मॉन्टेसरी संघ स्थापन केला. आणि त्याचे शिक्षण पत्रिका हे मुखपत्र सुरु केले. श्रीमती ताराबाई मोडक यांनी १९३३ मध्ये मराठीतून ही शिक्षण पत्रिका सुरु केली. शिक्षण पत्रिकेचे हे ७५ वे वर्ष आहे. पुढे मॉन्टेसरी संघाचे रूपांतर नूतन बालशिक्षण संघात झाले. आज बालशिक्षणासंदर्भातील अनेक प्रश्नांचा उहापोह करणारे असे नूतन बालशिक्षण संघाचे शिक्षण पत्रिका हे एक व्यासपीठ बनले आहे. आपल्याला माहीत आहे की जी मुखपत्रे नाण्याच्या दोन्ही बाजू समर्थपणे आम जनता आणि शासन यांच्या पुढे मांडतात, प्रश्नांचा सर्व बाजूंनी विचार करुन संपूर्ण विषयाचे साकल्याने दर्शन घडवू शकतात. त्यांना जनपत्राचे रूप येते. आज शिक्षण पत्रिका हे बालशिक्षणाचे जनपत्र बनले आहे. परिसरातून बालशिक्षण आणि बालशिक्षणाकरवी समाज शिक्षण या दिशांनी बालशिक्षणाला वळण देण्याचे कार्य नूतन बालशिक्षण संघाने या शिक्षण पत्रिकेतून केलेले दिसते. या दृष्टीने सुरूवातीपासूनच शिक्षण पत्रिकेतून बालशिक्षण व त्यासाठी मदत करणाऱ्या बालसेविकाचा विचार सातत्याने झालेला दिसतो. म्हणून शोध निबंधासाठी 'शिक्षण पत्रिकेच्या नजरेतून शिक्षक' हा विषय घेतला आहे.

प्रत्यक्ष अभ्यास सुरू केल्यावर लक्षात आले की ७५ वर्षातील शिक्षण पत्रिकांचा आवाका फार मोठा आहे; जो आपल्याला दिलेल्या वेळात मांडता येणे दुरापास्त आहे. म्हणून १९३३ ते १९७२ या ४० वर्षातील उपलब्ध शिक्षण पत्रिकांतून शिक्षकांबद्दल असलेल्या लेखांचाच मर्यादित विचार या शोध निबंधात केला आहे. या कालावधीत

शिक्षण पत्रिकेचे तीन संपादक होऊन गेले आहेत. जून १९३३ ते जून १९३९ श्री गिजुभाई बधेका, जून १९३३ ते १९५५ श्रीमती ताराबाई मोडक, एप्रिल १९५५ ते ऑगस्ट १९८४ श्री. शेष नामले त्यामुळे मुख्यत्वे करुन श्री. गिजुभाई बधेका, श्रीमती ताराबाई मोडक आणि श्री. शेष नामले यांचे विचार लेखातून प्रसृत होतात. याशिवाय श्री. ल. वा. पडोळे, श्री. भा. धों. कर्वे, श्री. रामभाई, श्री. स. आ. केळकर, श्रीमती अनुताई वाघ, डॉ. चित्रा नाईक यांचेही अभ्यासपूर्ण लेख आले आहेत.

सन १९३३ ते १९७२ या कालखंडात शिक्षण पत्रिकेत शिक्षकांबद्दल ४६ लेख मिळाले. त्यापैकी शोधनिबंधासाठी ३० लेखांचा अभ्यास केला. अभ्यासाच्या सोयीसाठी लेखांचे तीन गट केले आहेत.

१) शिक्षकांचे प्रश्न

२) शिक्षकांचे प्रशिक्षण

३) बालशिक्षिकेची भूमिका

एकेका विषयांचा शिक्षण पत्रिकेतील लेखांच्या आधाराने आपण विचार करू.

**१) शिक्षकांचे प्रश्न :**

बालशिक्षण शास्त्रीय, दर्जेदार आणि बालकाभिमुख होण्यासाठी शिक्षक आपल्या कुवतीनुसार खूप प्रयत्न करीत असतो. पण ही जबाबदारी पार पाडत असताना विविध पातळ्यांवर शिक्षकाला प्रश्न भेडसावत राहतात. उदा. शिक्षकांना मुलांबरोबर असताना येणारे प्रश्न, खेडेगावातील शिक्षकांचे प्रश्न, शिक्षकांची कार्यक्षमता वाढवण्याचा प्रश्न, सामाजिक आणि आर्थिक प्रतिष्ठेचा प्रश्न, पगाराचा प्रश्न, शिक्षण पत्रिकेतील लेखांतून यांचा सविस्तर विचार केलेला दिसतो.

मुलांबरोबर व्यवहार करीत असताना शिक्षकांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. ऑक्टोबर १९४२ च्या अंकातील 'शिक्षकांपुढील प्रश्न' या लेखात श्रीमती ताराबाई मोडक म्हणतात, ''मॉन्टेसरी धर्तीवर चालणाऱ्या शाळांत वर्गातील पटापट कामे करणारी मुले पुढचे मागत असतात. काही मुले मध्यम गतीने कामे करतात. पुढचे दाखवलेले हळूहळू करीत असतात. अशा पुढे मागे असलेल्या सर्व मुलांचे वेळचेवेळी काम पुरे पाडणे हा शिक्षकांचा मुख्य प्रश्न असतो. शिक्षक कोठल्या तरी एका विद्यार्थ्याबरोबर राहतो. पुढे जाणाऱ्याबरोबर राहिल्यास मागे पडणाऱ्या मुलांकडे बहुधा दुर्लक्ष होते व ती मागेमागेच राहतात. उलट मागे राहणाऱ्या मुलांत गुंतलेला शिक्षक पुढच्या मुलांकडे दुर्लक्ष करतो. त्या मुलांस नुसते बसावे लागल्याने त्याची वाढ खुंटते. शिक्षकाचे सर्वांत कठीण काम सर्व मुलांकडे लक्ष देणे.

सोपी उदाहरणे देऊन सोप्याकडून कठीणाकडे हळूहळू व्यवसायाची पातळी उंचावत नेऊन मुलांचा उत्साह वाढवीत त्यांच्यात आत्मविश्वास कसा निर्माण होतो, हे श्रीमती ताराबाईंनी पटवून दिले आहे. सन १९४२ साली श्रीमती ताराबाईंनी मांडलेल्या प्रश्नाला अजूनही योग्य उत्तर मिळालेले दिसत नाही. आता 'मल्टीग्रेड, मल्टीलेव्हल टेक्निक' च्या माध्यमातून शिक्षणतज्ज्ञ उत्तर शोधत असताना आपण पाहतो. आज वर्ग संख्या वाढली आहे. शिक्षक मात्र एकच असल्याने विविध स्तरांतून येणाऱ्या मुलांच्या क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने सर्व क्षमतांच्या मुलांना एकाच पारड्यात टाकून त्यांच्या शिक्षणाबाबत एकत्रित उपाय योजना करणे हे अन्यायकारक आहे.

खेडेगावातील शिक्षक प्रश्नाबाबत फेब्रुवारी १९६३ च्या अंकात 'बालवाड्यांचा शिक्षक प्रश्न' या लेखात श्री. शेष नामले म्हणतात, ''खेड्याखेड्यांतून बालवाड्या निघत आहेत. गावकऱ्यांची साथ आहे. उत्साहाची, बालकांची उणीव नाही, पुढाऱ्यांची इच्छा आहे. प्रयत्न केले तर पैसेही मिळतात, जी काही अडचण आहे ती

मार्गदर्शनाची आणि चांगल्या शिक्षकांची. शिक्षिका मिळवण्यासाठी खेड्यांतील मंडळी जिल्हा वा शहरांकडे पाहतात. पण शहरी मंडळी खेड्याकडे वळायला तयार नाहीत व टिकत नाहीत.'' अशा वेळी गावातील लोकांनाच प्रशिक्षित करुन कार्य पुढे नेणे गरजेचे आहे. त्यांची भाषा, विचारांची दिशा ग्रामीण शिक्षक अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतो. त्यासाठी खेडेगावातून प्रशिक्षणाची सोय करावी किंवा अशा प्रशिक्षणार्थींना आर्थिक सहाय्य करून शहरात प्रशिक्षणास पाठवावे.

श्री. शेष नामले यांनी सन १९६३ साली मांडलेली परिस्थिती थोड्या फरकाने आजही दिसून येते. खेडेगावातच प्रशिक्षणाच्या संकल्पनेचा वापर गडचिरोलीत शोधग्रामच्या कार्यासाठी डॉ. अभय बंग यांनी केला आणि तो यशस्वी झाला. ग्रामीण भागातील स्त्रियांना रोगनिदान आणि उपचार करण्याचे वैद्यकीय शास्त्र त्यांच्या गरजेपुरते शिकवून बालमृत्यूचा दर कमी करण्यात ते यशस्वी झाले. त्यांच्या संपूर्ण कामाचा कणा स्थानिक व्यक्तींचा सहभाग हाच आहे. जे वैद्यकीय क्षेत्रात घडू शकते ते शिक्षण क्षेत्रात (कोसबाड, आयना सारखे अपवाद वगळल्यास) फारसे प्रभावीपणे घडलेले दिसत नाही.

मार्च १९७० च्या 'एक शिक्षकी शाळा हव्याच' या लेखात खेडेगावातील शिक्षकांच्या वैयक्तिक आणि स्थानिक प्रश्नांबाबत अधिक सखोल विचार झालेला दिसतो. शिक्षकांच्या <u>वैयक्तिक अडचणी</u> म्हणजे १) राहायला जागा नाही २) जीवनावश्यक वस्तू चटकन मिळत नाहीत ३) औषधपाणी, टपाल, वर्तमानपत्रे मिळत नाहीत ४) स्वत:च्या मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय होत नाही ५) आपल्या बरोबरीची माणसे गप्पागोष्टी करून मन मोकळे करण्यास मिळत नाहीत. <u>स्थानिक अडचणी :</u> १) पालकांचे सहकार्य नाही २) मुलांना घरगुती कामे करावी लागतात. उदा. गुरे सांभाळणे ३) मुलांना लहानपणापासून पोटासाठी कमाई करावी लागते ४) शिक्षक पुस्तकी भाषा वापरून शिकवतो, ती मुलांना समजत नाही ५) एका जागेवर बसून ऐकावे, लिहावे, पहावे लागते. याची सवय नसल्याने ती एकाग्र होऊ शकत नाहीत. परिणामी शिकवलेले विसरतात. त्यामुळे शिक्षकांना शिकवण्यात रस वाटत नाही. अशा अनेक अडचणी मांडल्या आहेत.

याच लेखात पुढे 'गावात शाळा असल्यामुळे त्या निमित्ताने काही तरी जागृत होईल. सुशिक्षितपणाचे वातावरण राहील' असा सकारात्मक विचारही मांडलेला दिसतो. आपले प्रश्न आपणच सोडवण्याचा आत्मनिर्भर दृष्टिकोन शिक्षण पत्रिका बालशिक्षकांच्या मनात रुजवताना दिसते.

सप्टेंबर १९६४ च्या अंकातील 'शिक्षक दिनाच्या निमित्ताने' या संपादकीय लेखात श्री. शेष नामले यांनी शिक्षकांचे प्रश्न विविध पातळ्यांवरून अभ्यासलेले दिसतात.

''देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिक दलात सैनिकांची विविध प्रकारची तपासणी होते. त्यांना कार्यक्षम करण्यासाठी विविध प्रकारची शिस्तबद्ध तालीम होते. ती विसरली जाऊ नये म्हणून परिपाठ ठेवण्यात येतो. पण शिक्षकांच्या सैन्याबाबत शासन व समाजाची उदासीनता दिसते. शिक्षकाच्या भूमिकेचे महत्त्व त्यांना अजून समजलेलेच नाही.''

जगात ज्ञानविज्ञानच्या मर्यादा वाढत आहेत. शिक्षकाने आपले ज्ञान, कौशल्य सतत वाढवत ठेवले पाहिजे. त्यासाठी विविध सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

<u>शिक्षण प्रणालीतील भेदभाव</u> - यात राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रणालिकेत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक अशा तीन श्रेण्या पाडण्यात आल्या आहेत. मोठ्या गटाच्या शिक्षकांपेक्षा प्राथमिक गटाला अधिक

पात्रतेच्या शिक्षकांची गरज आहे. पण वरचे शिक्षक प्राथमिक शिक्षकांकडे कमी दर्जाचे म्हणून पाहतात. त्यांच्या जीवनाच्या राहणीत खूप फरक असल्याने ते समान भूमिकेवर येऊ शकत नाहीत.

सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठेच्या प्रश्नाबाबत श्री. शेष नामले म्हणतात, ''प्राथमिक शिक्षकाला कारखान्यात काम करणाऱ्या मजुराइतका किंवा मोटार हाकण्याचे काम करणाऱ्या चालका इतकाही पगार मिळत नाही. अशा स्थितीत शिक्षकाची आर्थिक - सामाजिक प्रतिष्ठा समाजघटकांचा घटक म्हणून कशी राहणार? जोपर्यंत शिक्षकांची आर्थिक लाचारी संपत नाही तोपर्यंत शिक्षकाला सामाजिक प्रतिष्ठा कशी मिळणार?''

शिक्षकांची स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या व्यवसायाची आर्थिक पातळी इतकी खाली गेली आहे की बुद्धिमान, कर्तबगार वर्गाला या क्षेत्रातील कार्याविषयी कोणत्याही प्रकारचे आकर्षण राहिलेले नाही. शिक्षकांची हुशार मुलेही आपल्या वडिलांचा व्यवसाय सोडून इतर आकर्षक क्षेत्रे पंसत करताना दिसतात, किंबहुना आकर्षक क्षेत्रात निवड न झालेली मंडळी या क्षेत्राकडे वळताना दिसतात. येथील निवडीवर निर्बंध नाहीत. शिक्षकांच्या संघटना प्रभावी नाहीत. त्यामुळे न्याय्य हक्कांसाठी लढण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नाही. अशी शिक्षकांची केविलवाणी स्थिती झाली आहे.

विद्यार्थिनी जेव्हा देशाचे जबाबदार नागरिक म्हणून नावलौकिक मिळवतात, देशासाठी काही भरीव कामगिरी करतात, तेव्हा शिक्षकाला त्यांचा मोठा पगार वाटतो यात शंका नाही. पण काही मुलभूत प्रश्न, शिक्षकांच्या वेतन धोरणात वर्षानुवर्षे अनुत्तरीतच राहतात, त्या प्रश्नांचा उहापोह शिक्षणपत्रिकेतील लेखांमध्ये आढळतो.

बालवाडी शिक्षक शाळेचे नियुक्त तास बालकाला अनौपचारिक बालशिक्षण देण्यात घालवतो. तासांच्या काळासाठी साहित्याची जमवाजमव करणे, पाठांचे नियोजन करणे, बालशिक्षणासाठी सतत अद्ययावत प्रशिक्षणे घेत राहणे यात त्यांना सेवाबाह्य वेळही खूप द्यावा लागतो, नव्हे त्याने तो देणे ही त्याच्या पेशाची गरजच आहे. असे असताना, पूर्वप्राथमिक क्षेत्रातील शिक्षकाच्या अध्यापनाची किंमत महिना रु. १,५०० आणि प्राथमिक शिक्षकांच्या शिकवण्याची किंमत महिना १० ते १५ हजार रुपये असे का? या प्रश्नाचे उत्तर देताना अर्थशास्त्र म्हणते की, प्राथमिक शिक्षक अधिक कुशल आहे आणि पूर्वप्राथमिक शिक्षक तितका नाही. पण अकुशल कामगारही जर त्याच्या पूर्ण क्षमता त्याच्या कामाच्या ठायी वापरत असेल तर त्याच्या सेवेचे मोल कुशल कामगाराच्या प्रतीचेच होईल, याचा कुणी विचार करील तर आजही अंगणवाडी शिक्षकांना 'निदान जगण्यास सहाय्यभूत ठरेल एवढा तरी वेतन द्या' असा कंठशोष करावा लागणार नाही.

सप्टेंबर १९४७ सालच्या शिक्षणपत्रिकेतील 'बालमंदिरांच्या शिक्षकांचे पगार' या लेखात ताराबाई मोडक कळकळीने लिहतात, ''पगारवाढ झाली पाहिजे ही गोष्ट तर निर्विवाद आहेच; पण खरे पाहता, ती तिप्पट व्हायला हवी आहे म्हणजे मोठ्या चैनीने नव्हे पण पूर्वी जसे गरीबीने राहत होते तसे तरी निदान राहता येईल.''

याच काळात (१९४७ साली) नूतन बाल शिक्षण संघाच्या मुंबई शाखेने बालशिक्षक आणि शाळाचालक यांच्या दोघांच्या दृष्टिकोनांचा विचार करून बालशिक्षकांचे पगार, पगारवाढ, रजा, प्रोव्हिडंट फंड यांची योजना करण्याचे काम हाती घेतले असल्याचा उल्लेखही पत्रिकेत आढळतो. या विषयी सुद्धा शिक्षणपत्रिकेची महत्ता ही की पत्रिकेत पगारवाढीसाठी शिक्षकाची बाजू घेता घेता ताराबाई बालशिक्षकांच्या भाडोत्री वृत्तीवरही कोरडे ओढताना दिसतात.

पगाराच्या संदर्भात जानेवारी १९५९ च्या अंकातील

'लेनिनग्राडचे प्रशिक्षण विद्यालय' या लेखात श्री. शेष नामले रशिया देशात बालशिक्षकाला दिल्या जाणाऱ्या पगाराची चर्चा करताना दिसतात. ते म्हणतात, ''प्राथमिक शिक्षकांचा सुरूवातीचा पगार ७४५ रुबल्स तर माध्यमिक शिक्षकांचा ९०० रुबल्स. दर पाच वर्षानी पगारात ५% वाढ होते. खेड्यात काम करणाऱ्या शिक्षकांना २५% पगार अधिक देण्यात येतो. या शिवाय त्यांना घर व १/२ हेक्टर जमीन सरकारकडून मिळते. विश्रामगृहात सवलतीच्या दराने सुट्टीचा काळ घालवता येतो.''

वर्ल्ड बुक एन्सायक्लोपिडीयाचा संदर्भ घेतला असता असे दिसून येते की याच संदर्भात अमेरिकेतील प्राथमिक शिक्षकांचा पगार १९८१ साली वार्षिक वेतन सुमारे १९,००० डॉलर्स; तर माध्यमिक शिक्षकांना वार्षिक वेतन सुमारे २०,००० डॉलर्स होते. यातून पूर्व प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या पगारांत परदेशात फारशी तफावत नसल्याचे ध्यानात येते. कॅनडामधील प्राथमिक शिक्षकांचा सरासरी वार्षिक पगार २७,००० डॉलर्स एवढा, तर माध्यमिक शिक्षकांचा पगार ३१,५०० डॉलर्स प्रतिवर्ष एवढा होता. म्हणजेच कॅनडामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षक वेतनात तफावत अधिक जाणवते.

मग जगभरात पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षकांना समान दर्जा दिला जात असताना भारतातील बालशिक्षकांनी या संदर्भात संघटित होणे गरजेचे आहे आणि अशीच हाक ''बालशिक्षकांनो, आपण संघटित होऊया'' ही श्रीमती अनुताई वाघ यांनी नोव्हेंबर १९७१ मध्ये आपल्याला शिक्षणपत्रिकेतून दिलेली दिसते. त्या म्हणतात, ''शिक्षकांना पोटापुरते वेतन मिळणे आवश्यक नाही का? गरिबी हटवण्याची भाषा बोलत असताना बालवाडी शिक्षकांना मिळणारे पगार किती अपुरे आहेत याचा ही विचार व्हायला हवा. शिक्षिकेला ५० रु. पासून जास्तीतजस्त १०० रु पर्यंत पगार मिळतो. पुष्कळ ठिकाणी शिक्षिका जास्त पगारावर सही करुन जेवढी रक्कम कमी मिळते तेवढी लोकवर्गणी म्हणून चालक संस्थेकडे जमा करते, संघटने द्वारा अशा प्रश्नांचा विचार व्हावा असे वाटते.''

सन १९४७ ते १९७१ या काळात भारतीय अर्थशास्त्रावर समाजवादाचा पगडा होता. त्यामुळे ''कुवतीप्रमाणे काम - गरजेनुसार दाम'' या घोषणेचा अधिकार शिक्षणक्षेत्रातही शासनाने करावा असा अनुताई, श्री. शेष नामले यांचा होरा असणे साहजिक होते. पण आता भारताने साम्यवादी धोरण शिथिल केले आहे, तरीही प्राथमिक शिक्षकांच्या जोडीने बालशिक्षकांना पगार द्यावा ही हाकाटी क्षीण होत नाही. याचे कारण सहा वर्षापर्यंत आपण मुलाला जे शिक्षण दिले जाते त्याचे मोल आता जगाने जाणले आहे. मेंदूनिष्ठ शिक्षणात सहाव्या वर्षापर्यंत मानवी मेंदूची वाढ जवळ जवळ पूर्ण झालेली आढळते त्यामुळे सहा वर्षापर्यंत आपण मुलाला जितक्या अधिक अनुभवसंधी उपलब्ध करुन देऊ तितकी त्याची बुद्धिमत्ता वाढते हे सिद्ध झाले आहे. या पार्श्वभूमीवर बालवाडी शिक्षिका मुलाचे अनुभवक्षेत्र संपन्न करण्यास किती कुशल हवी याची जाणीव होते. अशा क्षमतेच्या शिक्षिकेची वेतनतश्रेणीही तिच्या सेवेप्रमाणेच प्रगत हवी यात शंका नाही. पण त्यासाठी परत प्रश्न उरतो संघटित होण्याचा.

शिक्षण पत्रिकेने १९३३ ते १९७२ ह्या ४० वर्षाच्या काळात परखड भूमिका घेतलेली दिसते. पण ह्या मुद्याबाबत सध्याच्या काळात शिक्षणपत्रिका मौन पाळून आहे.

**२) शिक्षक प्रशिक्षण :**

पगार कमी असल्याने कुशल शिक्षक या क्षेत्राकडे पाठ फिरवताना दिसतात. मग संस्थांची शिक्षकांची गरज भागविण्यासाठी गरजू पण अप्रशिक्षित व्यक्तीनाही या क्षेत्रात स्थान दिले जाते. त्यांना मुळातच बाल शिक्षणाची तत्वे, तंत्र, शिक्षणपद्धती, बालशिक्षणाची साधने, खेळणी यांचे महत्व समजलेले नसते. देशाची संस्कारक्षम भावी पिढी

ज्या शिक्षकांच्या हाती सोपवायची, त्यांच्या प्रशिक्षणाबद्दलची तळमळ शिक्षण पत्रिकातल्या अनेक सदरांतून आणि लेखांतून जाणवते. १९६३ नंतरच्या शिक्षण पत्रिकांतून शिक्षक प्रशिक्षणाबद्दल अधिक लेखन झाल्याचे दिसते.

महाराष्ट्रात १९६५ च्या सुमारास बालवाडी चळवळीला चांगला पाठिंबा मिळत होता. अनेक पूर्व प्राथमिक प्रशिक्षण संस्था सुरू झाल्या होत्या. विद्यार्थिनींशी संवाद साधण्यासाठी श्री. शेष नामले यांनी शिक्षण पत्रिकेतून कामातून साध्य करायच्या अपेक्षा, अभ्यासक्रम, घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे स्वरुप अशा गोष्टींचे सविस्तर विवेचन आणि मार्गदर्शन केले. 'बालकेंद्री शिक्षण' या खास लेखमालेतील 'पाठाचे स्वरूप' या लेखात मादाम मॉन्टेसोरींच्या साधनसामग्रीचा उपयोग करुन प्रत्यक्ष शिक्षणाचे कार्य कसे करायचे, त्याविषयी मार्गदर्शन, साधन सामग्रीचा विचार, व्यक्तिगत, सामूहिक पाठाचे स्वरूप कसे असावे याचे विवेचन उपयुक्त आहे. 'शिस्तीचा प्रश्न' या लेखात बालकेंद्री शिक्षण म्हणजे बालकांच्या स्वयंस्फूर्त क्रियांचे रक्षण आणि पोषण असेल तर अशा शिक्षणातील मुलांना शिस्त कशी लावावी हा विचार येतो.

या लेखमालेतील नामले यांचे विचार आजही शिक्षकांना मार्गदर्शक आणि नव्याने विचार करायला लावणारे आहेत. शिक्षकाने शिकवायचे नसून शिक्षणाची साधने बनवायची आहेत. पाठ घ्यायचे नसून मुलांसाठी प्रयोग म्हणून सादर केले तर मुलांचे स्वयंशिक्षणाचे ते साधन होतील. त्यांना स्वयंस्फूर्तीने शिकण्याचे स्वातंत्र्य मिळेल व तो आनंद काही वेगळाच असेल. हे लेख आजही प्रशिक्षण साहित्य म्हणून वापरता येण्याजोगे आहेत.

याच काळात चालणारे दुसरे सदर म्हणजे 'बालसेविकांशी हितगुज' महाराष्ट्रात त्यावेळी ४००० च्यावर बालवाड्या होत्या. त्यातील बालसेविका आणि शिक्षिका यांच्याशी संपर्क आणि मार्गदर्शन करता यावे या उद्देशाने श्रीमती अनुताई वाघ, श्रीमती मीनाक्षी आपटे, श्री. ज. शं. आपटे यांनी या सदराचे संचालन केले होते. बालसेविकांनी मे महिन्याच्या सुट्टीचा उपयोग कसा करावा, गावासाठी काय करावे, गावातील मोकळ्या जागेचा क्रीडांगणासाठी कसा वापर करावा, बालवाडीत निसर्ग विज्ञानाचा अनुभव कसा द्यावा त्यासाठी फुलपाखरांच्या आळ्या पाळण्याचे, वनस्पती विषयक प्रयोग कसे करावेत अशा अनेक गोष्टींचे मार्गदर्शन केले आहे. बालशिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरेही दिली आहेत. चांगल्या उपक्रमांबद्दल त्यांचे कौतुकही केलेले दिसते. प्रोत्साहनाने मुलेच काय पण शिक्षकाही कार्यप्रवण होतो, ही अनुताईंची धारणा होती. याचप्रमाणे 'शिक्षिकांचे अनुभव चिंतन' 'बालवाडी शिक्षिकेच्या रोजनिशीतून' अशा सदरांमधून शिक्षकांना अनेक नवीन अनुभव, बालशिक्षणात केलेल्या नवनवीन प्रयोगांची माहिती मिळत होती.

बालशिक्षणाविषयी तळमळ असणाऱ्या या सर्व मंडळींना शिक्षक प्रशिक्षणाची नितांत गरज वाटत होती. शिक्षकांना अधिक कार्यक्षम बनविण्याच्या दृष्टीने काय सोयी सुविधा असाव्यात यांचाही विचार एकीकडे चालू होता. बालशिक्षकासाठी प्रयोगशील, नव निर्मितीक्षम, उत्साही आणि मुलांबद्दल प्रेम असणारी व्यक्ती हवी किंवा हे गुण जोपासण्यासाठी त्यांना कार्य प्रवण करायला हवे होते. वरील सदरे काही प्रमाणात हे काम करीत असली तरी, पूर्णांशाने प्रशिक्षणाची गरज होतीच. १९५९ च्या जानेवारीच्या अंकात श्री. शेष नामले लेनिनग्राडला गेले असता तेथील प्रशिक्षण विद्यालयाला दिलेल्या भेटीचा वृत्तांत आहे. ते म्हणतात - ''१९५८ सालापासून ७ वी पास विद्यार्थ्यांना ४ वर्षाचा प्रशिक्षण कोर्स व आता मॅट्रिक पास विद्यार्थ्यांना दोन वर्षाचा शिक्षणक्रम करावा लागतो. ४ सत्रात असलेल्या या शिक्षणक्रमात प्रत्येकाला चौथ्या सत्रात तीन आठवडे वर्ग संचालन करुन दाखवावे लागते व तेथील

मुख्य शिक्षिकेचे शिफारस पत्र घ्यावे लागते. प्रशिक्षण परिणामकारक करण्याच्या दृष्टीने प्रत्येक विषयाला दोन खोल्या. एक विशिष्ट विषयाच्या शिक्षकांसाठी, ज्यात त्यांची पुस्तके, प्रशिक्षण साहित्य योजून तेथेच व्याख्यानाची योजना असे. दुसरी विद्यार्थ्यांसाठी ज्यात संग्रहालय, प्रदर्शन, विद्यार्थी - पुस्तकालय, अभ्यास करण्याची सोय वगैरे असे. तसेच विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांशी संपर्क ठेवून सर्वांना काम देण्याची, सेवाकाळात त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या विषयाचे अद्ययावत ज्ञान देण्याची, शिक्षण क्षेत्रातील प्रगतीची कल्पना देण्याची जबाबदारी स्वीकारतात. शिक्षकांसाठी संमेलने, चर्चा, परिषदा, प्रदर्शने यांची योजना केली जाते. यामुळे विद्यार्थ्यांशी संस्थेचा सतत संबंध राहतो व त्यांचे वैचारिक नवरचनेत शिक्षकाचे स्थान आणि महत्व सोव्हिएत सरकारने ओळखले असल्याने शिक्षक कार्यक्षम कसे राहतील याकडे तिथे फार लक्ष दिले जाते.

आपली शोकांतिका हीच की, अजूनही आपल्या सरकारला बालशिक्षणाचे महत्व पटलेले नाही. आजही मँट्रीक पास नसलेल्या विद्यार्थिनी बालशिक्षणाचे ६ महिन्याचे खाजगी प्रशिक्षण वर्ग पूर्ण करुन बालशाळा चालवण्याचे स्वप्न बाळगतात. किमान शैक्षणिक पात्रता नसूनही अनेक बालवाड्यांमध्ये शिक्षिका काम करीत आहेत. कोवळ्या मुलांना हाताळण्याची नीट सवय झालेली नसताना, त्यांच्या मनांचे कंगोरे उलगडण्याची ताकद नसताना मुले त्यांच्या हाती सोपवली जात आहेत.

बालवाडी शिक्षण हे खास शिक्षण आहे. बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाचा पाया घालणारे असे हे अनौपचारिक आणि संस्कारातून दिले व घेतले जाणारे शिक्षण आहे. म्हणून शिक्षकाला बालकांचे मानसशास्त्र अवगत असणे आवश्यक आहेच. पण त्याबरोबर या वयातील बालकांच्या विकासाचे कौशल्यही शिक्षकाकडे असणे आणि त्यादृष्टीने त्याचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. या विषयाच्या अनुषंगाने फेब्रुवारी १९६६ च्या अंकात 'पूर्व प्राथमिक प्रशिक्षणाची पुनर्विचारणा' या संपादकीय लेखात महाराष्ट्र शासनाने प्रशिक्षण सुधारण्याच्या हेतूने डॉ. चित्रा नाईक यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या प्रशिक्षण सुधारणा समिती विषयी व तिच्या कार्याविषयी माहिती दिली आहे.

यात समितीचा कार्यप्रदेश, पूर्व प्राथमिक प्रशिक्षणाचे प्रश्न, नागरी व ग्रामीण शिक्षणाचा प्रश्न, मॅट्रिक व नॉन मॅट्रिक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण क्रम, सध्याचा शिक्षणक्रम, प्रशिक्षणाचा काल प्रत्यक्ष अभ्यासक्रमातील फेराफार, शिक्षणसाधनांविषयक संशोधन, उत्पादन, वितरण, निरीक्षण व पूर्व प्राथमिक शिक्षण प्रशिक्षणासाठी बोर्डाची स्थापना हे विषय विस्तृत मांडले आहेत. यात श्री. नामले स्पष्टपणे म्हणतात, ''पूर्व प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच पूर्व प्राथमिक प्रशिक्षणाची घडी अजून योग्यप्रकारे बसलेली नाही. महाराष्ट्रतील पूर्व प्राथमिक प्रशिक्षण संस्थांची संख्या भारतातील एकूण प्रशिक्षण संस्थांच्या १/३ पेक्षा जास्त आहे. पण पूर्व प्राथमिक शिक्षकांना महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत सापत्न भावाने वागविले. पूर्व प्राथमिक संस्थांना देण्यात येणारी मान्यता, शिक्षकांची सेवा धोरणे, अनुदान पद्धती, पगार धोरणे, निरीक्षण पद्धती या सर्व गोष्टीत पूर्व प्राथमिक शिक्षणाला सध्याच्या परिस्थितीत कमीतकमी प्राथमिक शिक्षकाइतपत मान्यता व प्रतिष्ठा देणे अनिवार्य आहे. त्या शिवाय पूर्व प्राथमिक प्रशिक्षणात सुचवलेल्या कोणत्याही प्रकारच्या सुधारणांना काही अर्थ राहणार नाही.''

शिक्षण पत्रिकेतील लेखांमधून अनेकदा येणारा महत्वाचा विषय म्हणजे नागरी आणि ग्रामीण पातळीवरील प्रशिक्षण शिक्षण संस्थांची वाढ जरी दोन्ही भागात झाली असली तरी प्रशिक्षण संस्था मात्र शहरी भागात अधिक आहेत. येथे प्रशिक्षित झालेली मंडळी ग्रामीण भागात काम करण्यास उत्सुक नसतात. ग्रामीण प्रशिक्षकांना हे शिक्षण

सहजी उपलब्ध होत नाही. दूरच्या ठिकाणी जावे लागल्यास येणारा खर्च, मेहनत आणि मिळणारे वेतन यांची सांगड घालता येत नाही. त्यामुळे प्रशिक्षणाचा फायदा घेता येत नाही.

फेब्रुवारी १९६३ च्या 'बालवाड्यांचा शिक्षक प्रश्न' या संपादकी यात या विषयावर प्रकाश टाकला आहे. ''ग्रामीण प्रशिक्षणाच्या कामात जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला पाहिजे. जिल्ह्यातील आवश्यक बालवाड्यांचे संचालन केले पाहिजे. ग्रामीण विभागातील प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. योग्य विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांना विद्या वेतने दिली पाहिजेत, त्यांच्या प्रवेशाबाबत अग्रक्रम दिला पाहिजे. प्रशिक्षण क्रमाच्या अभ्यासात फेरफार करायला हवेत, सध्याचा शिक्षणक्रम ग्रामीण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने न झेपणारा आहे. मॅट्रिक विद्यार्थ्यांनाही तो २ वर्षाचा व्हावा असे मत व्यक्त करतानाच ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अल्पमुदतीचा शिक्षणक्रम योजण्यास मात्र त्यांचा विरोध आहे. तसे झाल्यास तो पूर्व प्राथमिक शिक्षणाचा फार्स ठरेल.'' असे श्री. नामले म्हणतात.

शिक्षण कार्यात शिक्षक हा महत्वाचा घटक आहे. त्याचे शिक्षण काळाच्या आणि शिक्षणाच्या गरजा ओळखून करणे आवश्यक ठरते. त्याला समर्थ बनवणे, त्याची कार्यपद्धती अद्ययावत करणे यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.

सेवांतर्गत अशी प्रशिक्षणे मिळण्यासाठी संघटनांची गरज आहे. मार्च १९६७ च्या अंकात श्री. नामले यांनी 'शिक्षक आणि प्रशिक्षकांच्या व्यावसायिक संघटना' या लेखात हे प्रामुख्याने मांडले आहे, ''शिक्षक संघ, मुख्याध्यापक संघ, प्राचार्य संघ वा प्रशिक्षक संघ अशा संस्था शिक्षणाच्या निरनिराळ्या क्षेत्रात वाढीस लागल्या आहेत. शिक्षकांचे व्यावसायिक प्रावीण्य वाढवण्याच्या दृष्टीने महत्वाचे कार्य करीत आहेत. पूर्व प्राथमिक शिक्षण क्षेत्रात अजून अशा संघटना स्थिर आणि कार्यान्वित झालेला नाहीत. नूतन बालशिक्षण संघ ही व्यावसायिकांची संघटना नाही. व्यावसायिक संघटनांमुळे शिक्षक प्रशिक्षकांना अधिक कार्यक्षम बनवता येईल, पूर्व प्राथमिक शिक्षण अधिक लोकप्रिय बनवता येईल, पण असे उपक्रम चालवण्यास लागणारे आर्थिक बळ संघटनांकडे नसते. संघटना कार्यान्वित ठेवण्यासाठी शक्ती नसते. शासनाने अशा संघटनांना अनुदाने दिली पाहिजेत. शिक्षण संस्था, शिक्षक प्रशिक्षण या सर्वच बाबतीत काही सर्वसामान्य धोरणे निर्माण करणे, हे या क्षेत्रातील संघटनांचे पहिले कार्य म्हणावे लागेल. राज्यात अशा शिक्षक संघटना वाढल्या पाहिजेत.''

अमेरिका, रशिया सारख्या प्रगत देशांमध्ये राबविण्यात येणाऱ्या शिक्षकांसाठीच्या योजनांत अशा संघटनांना अतिशय महत्त्व आहे. यामुळे साहजिकच शिक्षकाची गुणवत्ता आणि प्रतिष्ठा वाढते. आपल्याकडे अशा व्यावसायिक संघटना मोठ्या प्रमाणावर निर्माण होणे गरजेचे आहे. शिक्षकांनी शिक्षकांसाठी आत्मप्रेरणेने निर्माण केलेल्या शिक्षक संघटनांच्या निर्माणाला जर शासन, संचालक व खुद्द शिक्षक पातळीवर महत्व दिले गेले तरच आपल्याकडेही शिक्षकांची गुणवत्ता व प्रतिष्ठा वाढेल.

यालाच शिक्षकाचे नवनिर्माण म्हणता येईल. पण हे नवनिर्माण शिक्षकांनी पुढे होऊन संघटित झाल्याशिवाय शक्य नाही. पूर्व प्राथमिक विभागात शिक्षकांच्या व्यवसायासंबधी सामुदायिक जागृतीच झालेली दिसत नाही. यामुळे काही शिक्षक व्यक्तिश: अतिशय कार्यक्षम असतात पण व्यवसायासंबंधीची सामुदायिक जाणीव त्यांच्यात अभावानेच आढळते. त्यामुळे नोकरी टिकवणे एवढेच त्यांचे ध्येय बनते.

मे, १९६६ च्या शिक्षण पत्रिकेत 'नव शिक्षकाचे निर्माण' या लेखात श्री. नामले यांनी नमूद केले आहे की, ''एखादा शिक्षक पुढाकार घेऊन परिश्रमपूर्वक संघटना

उभारतो, पण त्याला कोणतेही सामाजिक व शासकीय साहाय्य नसते. आपल्या संघटनेद्वारे तो शिक्षकांची कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने व्याख्याने, शिबिरे अथवा संमेलने भरवितो. सुरूवातीस इतर शिक्षकांची साथ असते पण एकदा का पगार वा सेवानियम इत्यादी प्रश्न आले की संघटना थंड पडून विघटित होते. त्यामुळे व्यापक व्यावसायिक नेतृत्व करणे अशा संघटनांना जमत नाही.''

शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेल्या सुधारणा शिक्षकांनी स्वत:वर बंधनकारक करून घेतल्या पाहिजेत. तरच सशक्तरीत्या शिक्षकाचे नवनिर्माण होईल. चांगल्या प्रशिक्षणाबरोबर शासनाने शिक्षक संघटना वाढीस लागून प्रबळ कशा होतील हे बघितले पाहिजे. शिक्षक भवनात शिक्षकाचा दर्जा टिकवण्यासाठी शिबिरे, चर्चासत्रे, परिषदा आयोजित केल्या पाहिजेत. या संघटना प्रतिनिधींना शासनाने शिक्षणविषयक संशोधन, शिक्षक विषयक कल्याण कार्य, शिक्षणक्रम इत्यादी समित्यावर निमंत्रणे दिली पाहिजेत. शिक्षकांची कार्यक्षमता वाढण्याची जबाबदारी शासनाने अशा संघटनांवर सोपवली तरच शिक्षक प्रशिक्षणामुळे अपेक्षित असलेला परिपूर्ण शिक्षक तयार होईल.

शिक्षक प्रशिक्षण प्रभावी करण्यासाठी त्यात शिक्षक संघटनांचा सहभाग असावा असा अभिनव विचार शिक्षण पत्रिकेतून अर्ध्या शतकापूर्वीच मांडला गेला आहे. मात्र त्याची अंमलबजावणी आपण आजही करु शकलेलो नाही.

### ३) बाल शिक्षिकेची भूमिका :

शिक्षण पत्रिकेत बाल शिक्षकांबद्दल - शिक्षकाची मानसिकता, प्रतिष्ठा, शिक्षकाची भूमिका, शिक्षकाची कार्यक्षमता अशा विविध अंगांनी विस्तृतपणे विचार झालेला दिसतो. सुरुवातीच्या काळात बाल शिक्षकांकडून बालशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवावयाची असल्याने त्यांच्याबद्दल फार काटेकोरपणे मार्गदर्शन झाल्याचे दिसते. मूल बालवाडीत येण्याअगोदर त्याचे शिक्षक हे त्याचे पालकच असतात.

'शील शिक्षक कोण?' याबद्दल श्री. ल. वा. पडोळे फेब्रुवारी १९४२ च्या अंकात म्हणतात, ''मूल जन्मल्यापासून त्याला चांगल्या सवयी लागून त्या दृढ होईपर्यंत स्वत: आदर्श वागणूक ठेवणे हे काम कर्तव्यदक्ष पालकांचे असते. मुलांना चांगल्या प्रकारे व्यावहारिक शिक्षण देऊन त्यांना सुशिक्षित, सुशील कर्तव्यदक्ष व तेजस्वी करणे हे पालकांचे काम होय. म्हणून शीलाचे बरेचसे श्रेय पालकांकडे जाते.''

४०० वर्षापूर्वी जॉन ॲमस कोमेनिअसने आपल्या 'स्कूल ऑफ इनफन्सी' या पुस्तकात मांडलेली भूमिका आणि पडोळे यांची भूमिका मिळतीजुळती असल्याचे दिसते. त्यानेही ६ वर्षापर्यंत मुलांना औपचारिक शिक्षणाऐवजी पालकांनीच अनौपचारिक पद्धतीने शिकू द्यावे असे ठासून सांगितले होते. पालकांप्रमाणेच बालवाडीतील शिक्षकही शील शिक्षक असतो. कारण मूल नव्या विश्वाशी नाते जोडायला पाहिले पाऊल बालवाडीत टाकते. शिक्षकांच्या वागणूकीचा आणि संस्कारांचा परिणाम दीर्घ कालीन असतो. बालवाडीत मुलाच्या असुरक्षित भावनेला प्रेमाचा आधार देऊन संस्कार करणाऱ्या शिक्षकाचा प्रभाव मुलावर पडत असतो. त्यामुळेच, शिक्षण पत्रिकेतील पुढच्या लेखांतून शिक्षकांबद्दलच्या अपेक्षा उंचावत गेलेल्या दिसतात.

<u>शिक्षकाच्या मानसिकतेचा</u> विचार नोव्हेंबर १९४२ च्या श्री. भा. धों. कर्वे यांच्या 'मनोविकृत शिक्षक' या लेखात येतो. यात प्रेमाचा भुकेला, लाजाळू शिक्षक, चिकित्सेखोर व अनियत शिक्षक अशा विविध स्वभवांच्या शिक्षकांबद्दल चर्चा केलेली दिसते. ते म्हणतात, ''प्रेमाचा भुकेला शिक्षक स्वत:भोवती भक्तांचा मेळाच जमवतो.

तर लाजाळू शिक्षक इतरांपासून दूर राहतो. चिकित्सेखोर शिस्तीचा भोक्ता असल्याने कडक वागतो व मुलांवर धाकाने वजन ठेवतो. अनियत शिक्षकाची वागणूक अनिश्चित असते. तो कधी गंभीर, कधी कडक तर कधी आनंदी, उत्साही वातावरण निर्माण करतो.''

शिक्षकाच्या अशा वर्तनाने मूल चिडखोर, घाबरट बनू शकते. त्याच्या स्वाभाविक विकासाच्या आड भावनिकता येते.अनेक शिक्षकात वरील प्रकारच्या उत्प्रेरक भावना एकत्रितरीत्या असतात. पण शिक्षकाने कोणत्याही भावनेचा उद्रेक होणार नाही, यासाठी प्रयत्नशील रहायला हवे. मूल अनुकरणप्रिय असल्यामुळे आपल्या उणीवांवर मात करुन योग्य वातावरण मुलांना देण्याचा प्रयत्न करायला हवा. शाळेतील वातावरण पोषक, शिक्षकाच्या मनोवृत्ती जाणून घेणारे, त्याच्या कार्याला योग्य ती दाद देणारे असल्यास त्यातील दुर्गुण नष्ट होतील.

पण प्रत्यक्षात शिक्षक कसा वागतो याचे चित्र हे श्रीमती ताराबाई मोडक यांच्या १९३५ च्या अंकातील 'शिक्षकाची जबानी' यातून दिसते. त्या म्हणतात, ''किती वर्षापासून माझा शिक्षकाचा धंदा. पण शिक्षणशास्त्राविषयी एकही पुस्तक वाचले नाही. आम्ही शिक्षक एकत्र जमतो तेव्हा इतर गप्पा मारतो. शैक्षणिक अडचणी जणू कुणाला येतच नाहीत. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची चर्चाच केली जात नाही. विद्यार्थ्यांचा व आपला संबंध शाळेपुरताच. त्यांची हृदये अज्ञातच असतात. त्यांच्याविषयी प्रेम नाही, राग नाही. चुकली तर मात्र कडक शिस्तीचा अवलंब करतो. रस्त्यात भेटलो तर ब्याद टाळतो. स्वप्ने पडतात ती हेडमास्तरची पेन्शन होऊन सुखात दिवस काढण्याची. नवनवीन प्रयोग करण्यास लागणारा उत्साह माझ्या ठिकाणी नाही.''

श्रीमती ताराबाईंचा हा लेख आपल्या पेशाशी आपण एकनिष्ठ आहोत का? ह्याचा अंतर्मुख होऊन विचार करायला लावतो. शिक्षकांच्या अशा वर्तनाने आणि विचारांनी समाजात शिक्षकाचा दर्जा खालावत जातो. १९३८ च्या 'शिक्षकांचा दर्जा' या लेखात श्रीमती ताराबाई मोडक यांनी त्यांचे मत अगदी परखडपणे मांडले आहे. त्या म्हणतात, ''शिक्षकाच्या गुणांतील अभावामुळेच त्याचा दर्जा कमी झाला आहे. उदा. कामचुकारपणा व त्यामुळे येणारा अप्रामाणिकपणा. कार्यपरायणता व कार्यरततेच्या अभावामुळेच शिक्षक आपल्या दर्जावरुन खाली उतरला आहे.''

शिक्षकाने आपले तन, मन, धन अर्पून आपली भूमिका साकारली, मुलांच्या मानसिकतेचा सखोल अभ्यास केला, तर समाजातील प्रतिष्ठा उंचावण्यास नक्कीच मदत होईल. सप्टेंबर, १९४७ च्या 'शिक्षकांची प्रतिष्ठा' या लेखात श्री. रामभाई शिक्षकांना हेच पटवून देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. ते म्हणतात, ''कोणी मानपान दिला तर प्रतिष्ठा राहू शकेल असे समजणारा शिक्षक प्रतिष्ठेचे मूल्यमापन करताना चूक करतो. शिक्षक पैशाने प्रतिष्ठा आखू लागला तर त्याचे पडसाद समाजात उमटल्याशिवाय राहणार नाहीत. पण काही शिक्षक स्वत:च्या आंतरिक तेजाने समाजात स्वत:ची सुप्रतिष्ठा स्थापन करतात. शिक्षकांविषयीच्या अनन्य विश्वासातच मुलांचे, भावी प्रजेचे हित व शिक्षकाची खरी प्रतिष्ठा वास करते. अनन्य विश्वास मिळवण्याचे साधन म्हणजे 'बालकांविषयी प्रेम' हेच आहे आणि अशा शिक्षकांची समाज कदर केल्यावाचून राहत नाही.''

बालकांवर प्रेम करणारा असा शिक्षक मुलांची नस बरोबर हेरतो. मुलांना पचेल, रुचेल अशाच व्यवसायांचे नियोजनपूर्वक आयोजन करतो. शांत आणि प्रसन्न वातावरणात मुलंच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटतो. १९३४ च्या अंकातील श्री. गिजुभाई बधेका यांचा ''मी प्राथमिक शाळेचा शिक्षक झालो तर...'' हा लेख असा सुंदर वर्ग हाताळणीचा नमुना आहे.

*प्रयत्न करणाऱ्यांनी नेहमी लक्षात ठेवावे, धावत्या पाण्यातच मार्ग सापडतो.*

मूल जसे शिक्षकाच्या मार्गदर्शनामुळे शिकत असते तसाच शिक्षकही विविध अनुभवांतून, मुलांच्या निरीक्षणातून शिकत असतो. ही शिक्षणप्रक्रिया कधीच न संपणारी आहे. १ मार्च १९३८ च्या ऑल इंडिया रेडिओवरील भाषणात श्रीमती ताराबाई मोडक म्हणतात, ''बालकांची शाळा ही शिक्षकाची शिक्षण प्राप्त करण्याची भूमी आहे. फक्त शिक्षण प्राप्त करण्याची इच्छा व पात्रता असली पाहिजे व शिकवण्याची नम्रता. बालके ही चालती बोलती पुस्तके आहेत. ती वाचण्याची तसदी शिक्षकाने घ्यावी.''

यावरून लक्षात येते की, समाजाच्या शिक्षकांकडून असणाऱ्या अपेक्षांची पूर्तता करण्याची पात्रता शिक्षकाने आपल्या अंगी बाणवली पाहिजे. चांगला नागरिक घडवण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. शिक्षकाच्या आदर्श भूमिकेबद्दल पत्रिकेत फारच डोळसपणे लेखन झाल्याचे दिसते.

फेब्रुवारी १९५६ मधील 'नव्या युगाचा शिक्षक' यात श्री. स. आ. केळकरांना शिक्षक नवे विचार, अनुभवी, अध्यापन कला अवगत असणारा, वर्गात शांतता राखणारा, न्यायी, कार्यदक्ष, शारीरिक व मानसिक दृष्ट्या निरोगी असावा असे वाटते.

शिक्षिकेचे मुख्य कार्य बालकांच्या स्वयंस्फूर्त अविष्कारांचे अवलोकन करणे हे आहे. बालकाच्या नैसर्गिक विकासवर तिची श्रद्धा हवी. तिने आत्मनिरीक्षण करुन आपल्या मनाला आध्यात्मिक वळण दिले पाहिजे. शिक्षक हा शालेय वातावरणाचा प्राण आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षकांच्या प्रेरणेमुळेच विद्यार्थ्यांच्या जीवनात स्फूर्ती येते.

शिक्षिकेला 'स्वयं प्रेरणा जागृत करणारी' परिचारिका, माता, कलाकार, शास्त्रज्ञ, समाजसेविका, संस्कृतीरक्षिका, मार्गदर्शिका अशा विविध भूमिका घ्याव्या लागतात. समाजाने म्हणजेच पालक आणि संस्था चालकांनी तिला मदतीचा हात द्यावा. त्यांच्या घनिष्ठ संबंधातूनच सर्वांगीण विकास साध्य होणार असतो. असे मत फेब्रुवारी १९६३ च्या अंकात व्यक्त केले गेले आहे.

ऑगस्ट, १९६६ च्या अंकात 'बालवाडी शिक्षिकेला शिक्षणवेत्त्याची भूमिका घ्यावीच लागते.' अशा मथळ्याचा श्री. नामले यांचा लेख आहे. ते म्हणतात, ''शिक्षणवेत्ता समाजाचे मार्गदर्शन करतो. शालेय अभ्यासक्रमाचे स्वरूप ठरवतो. शिक्षणपद्धतीचे संशोधन करतो. शिक्षणाच्या साधनात परिणामकारक फेरबदल घडवतो. हेच सर्व कार्य शिक्षिकेला करावे लागते.''

या सर्व शिक्षकाला आपली कार्यक्षमता वाढवण्याच्या दृष्टीने मनापासून खूप प्रयत्न करावे लागतात. नवीन शैक्षणिक साधनांची निर्मिती करुन त्यांचा शिक्षणात अवलंब करणे, आपल्या शैक्षणिक प्रयोगातून आपले साध्य गाठता आले का? याचे मूल्यमापन करणे हे शिक्षकाला आवश्यक ठरते. मार्च १९६६ च्या 'उन्हाळ्याच्या सुट्टीचा उपयोग कसा कराल?' या लेखात श्री. नामले यांनी मोलाचा सल्ला दिला आहे. ते म्हणतात, '' सुट्ट्यांचा शिक्षकांची कार्यक्षमता वाढीच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. नव्या आगामी वर्षाची योजना तपशीलासह घडली गेली पाहिजे. समग्र वर्षातील कार्यक्रमांची यादी व त्या संबंधी पेपर लिहून चर्चा झाली पाहिजे. शिक्षकांचे कौशल्य वाढविण्याचा दृष्टीने तज्ज्ञांची मदत मिळवणे, निश्चित प्रकल्प योजून पार पाडणे, अशा सुनियोजित आखणीमुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणींना तोंड द्यावे लागणार नाही.''

मे, १९६८ च्या 'शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा प्रश्न' या लेखातील महाराष्ट्र राज्य शिक्षण शास्त्र संस्थेच्या संचालिका डॉ. चित्रा नाईक यांचे विचार अधिक मोलाचे आहेत. अमेरिका आणि सोव्हिएत रशियात शिक्षकांच्या व्यवसायिक वाढीसाठी राबविलेल्या कार्यक्रमांची माहिती

त्यातून मिळते, त्या म्हणतात, ''शिक्षकांच्या सेवाकाळात सेवांतर्गत प्रशिक्षणाचा समावेश असतो, दर आठवड्याला किंवा महिन्याला शिक्षक आपल्या कामातील महत्वाचे अनुभव एकमेकांपुढे मांडतात यामुळे नव्या अध्यापन तंत्राचे अभिसरण व पाठ विषयावर विचार मंथन होते. जिज्ञासू वृत्तीला पोषण मिळते. सृजनशीलतेचे स्वागत होत असल्याने, शिक्षक उत्साही व कार्यमग्न राहतात.''

आपल्याकडे असे प्रयत्न झाल्यास शिक्षकाची कार्यक्षमता वाढेल. त्यामुळे शिक्षकाची व्यावसायिक उंचीही वाढेल. नवनवीन प्रयोग करण्याचा उत्साह येऊन बाल शिक्षण गतिमन आणि प्रभावी होण्यास मदत होईल. डिसेंबर,१९६३ च्या 'शिक्षकांचा उत्साह कसा वाढेल' या लेखात तर श्री. नामले यांनी शिक्षकाला शिक्षण योजनेचा कणाच म्हटले आहे. त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी, त्यांच्या कामातील अडचणी सहानुभूतिपूर्वक समजावून योग्य ते बदल करावेत. शाळेतील पोषक वातावरण व सहकाऱ्यांचे सहकार्य यामुळेच शाळेचेही वातावरण उत्साही राहील. शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांचाही उत्साह वाढेल म्हणजेच बालशिक्षण दर्जेदार आणि प्रभावी होईल.

आतापर्यंतच्या विवेचनावरून शिक्षण पत्रिकेने शिक्षकाकडून फार मोठ्या अपेक्षा केल्या आहेत. काही वेळा शिक्षण पत्रिका अति आदर्शवादी भूमिकेकडे झुकल्याचेही जाणवते. पण आदर्श काय आहे हे समोर ठेवल्याशिवाय प्रगतीची पावले पडणार नाहीत. हे लक्षात घेता, या लेखांतून उभे राहिलेले चित्र हे दीपस्तंभासारखे आहे. ज्याच्या प्रकाशात प्रत्येक शिक्षकाने स्वत:ला तपासून पहावे. शिक्षण पत्रिकेत या ४० वर्षात संस्थेने आणि प्रश्न आजही तसेच आहेत. अशा तऱ्हेच्या अभ्यासाचा उपयोग पुढील ध्येय धोरणे आखणाऱ्यांना सुरूवातीचा संदर्भ म्हणून, होईल अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ सूची**

| महिना | वर्ष | लेखाचे नाव | लेखक |
|---|---|---|---|
| | १९३४ | मी प्राथमिक शाळेचा शिक्षक झालो तर | श्री.गिजुभाई बधेका |
| | १९३५ | शिक्षकाची जबानी | श्रीमती ताराबाई मोडक |
| मार्च | १९३८ | शिक्षकांचा दर्जा | श्रीमती ताराबाई मोडक |
| मार्च | १९३८ | शिक्षक शिक्षण | श्रीमती ताराबाई मोडक |
| फेब्रु. | १९४२ | शील शिक्षक कोण? | श्री. ल. वा. पडोळे |
| ऑक्टो. | १९४२ | शिक्षकांपुढील प्रश्न | श्रीमती ताराबाई मोडक |
| नोव्हें. | १९४२ | मनोविकृत शिक्षक | श्री.भा.धों.कर्वे |
| सप्टें. | १९४७ | शिक्षकांची प्रतिष्ठा | रामभाई |
| सप्टें. | १९४७ | बालमंदिरांच्या शिक्षकांचे पगार | श्रीमती ताराबाई मोडक |
| फेब्रु. | १९५६ | नवयुगाचा शिक्षक | श्री.स.आ. केळकर |
| जाने. | १९५९ | लेनिनग्राडचे प्रशिक्षण विद्यालय | श्री. शेष नामले |
| | १९५९ | रशियातील बालोद्याने | श्री. शेष नामले |
| एप्रिल | १९६० | मॉंटिसरी पद्धतीच्या शिक्षिकेची भूमिका | श्री. शेष नामले |
| फेब्रु. | १९६३ | बालवाड्याचा शिक्षक प्रश्न | श्री. शेष नामले |
| डिसें. | १९६३ | शिक्षकांचा उत्साह कसा वाढेल | श्री. शेष नामले |
| सप्टें. | १९६४ | शिक्षक दिनाच्या निमित्ताने | श्री. शेष नामले |
| एप्रिल | १९६५ | बालकेंद्री शिक्षण - पाठांचे स्वरुप | श्री. शेष नामले |
| मे | १९६५ | बालकेंद्री शिक्षण शिस्तीचा प्रश्न | श्री. शेष नामले |

| | | | |
|---|---|---|---|
| | १९६५ | क्रीडांगण आणि खेळ | श्रीमती मीनाक्षी आपटे |
| ऑगस्ट | १९६५ | बालसेविकांशी हितगुज | श्रीमती अनुताई वाघ |
| | १९६५ | बालवाडी आणि निसर्ग विज्ञान | श्रीमती अनुताई वाघ |
| फेब्रु. | १९६६ | पूर्व प्राथमिक प्रशिक्षणाची पुनर्विचारणा | संपादकीय नामले |
| मार्च | १९६६ | उन्हाळ्याच्या सुट्टीचा उपयोग कसा कराल? | श्री. शेष नामले |
| ऑगस्ट | १९६६ | बालवाडी शिक्षिकेला शिक्षणवृत्त्याची भूमिका घ्यावीच लागते | श्री. शेष नामले |
| मार्च | १९६७ | शिक्षक प्रशिक्षकांच्या व्यावसायिक संघटना | श्री. शेष नामले |
| मे | १९६८ | शिक्षकांच्या कार्य - क्षमतेचा प्रश्न | डॉ. चित्रा नाईक |
| मार्च | १९७० | एक शिक्षकी शाळा हव्याच | |
| नोव्हें. | १९७१ | बालशिक्षकांनो आपण संघटित होऊ या | श्रीमती अनुताई वाघ |

(सौ. रोहिणी रसाळ वि.प्र. मंडळाच्या ए.के. जोशी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थीनी आहेत.)

**सौ. रोहिणी रसाळ**
मुख्याध्यापिका
सरस्वती मंदिर ट्रस्ट
पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे

•••

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

(स्थापना : १ ऑगस्ट १९३५)

**विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्था**

१) डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मराठी माध्यम)

२) सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम विद्यालय (इंग्रजी)

५) बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

६) के. ग. जोशी कला महाविद्यालय

७) ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

८) वि. प्र. मंडळाचे टी. एम्. सी. विधी महाविद्यालय

९) वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

१०) प्रगत अभ्यास केंद्र

११) डॉ. वा .ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था

*क्रोधामुळे विवेक नाहीसा होतो.*

# श्री संतचोखामेळा (लेखांक दुसरा)

*श्री संत चोखामेळा यांच्या जीवन चरित्रावरील माहिती देणाऱ्या लेखाचा पुढील भाग येथे देत आहे- संपादक*

**चोखोबांची गुरू परंपरा :**

भारतात गुरू परंपरेला अतिशय महत्त्व आहे. अनेक ग्रंथांतून याबद्दल विस्तृत माहिती मिळते. मुण्डक उपनिषद, गीता, योगदर्शन, श्रीमत् भागवत, गुरुगीता, महाभारत, रुद्रयामळ, मंत्र शास्त्र, दैवी मीमांसा दर्शन आदी ग्रंथांवरून ही माहिती मिळू शकेल. जगातील बहुतेक संप्रदाय व धर्म पंथ यांच्यात गुरुदीक्षा पद्धती दिसून येते. गुरू वाचून ब्रह्म प्राप्ती नाही, हा सिद्धांत असल्याने सर्वांना गुरू करावा लागतो.

काहींना गुरू शोधावा लागतो; मात्र चोखोबांना गुरुकृपेसाठी कोठे हिंडावे लागले नाही. त्यांचे भाग्य फार मोठे म्हणून नामदेवरायांचा सहवास व गुरुकृपा या दोनही गोष्टी त्यांना प्राप्त झाल्या. चोखोबा नामदेवरायांच्या हाकेला ओ देऊन भागवत धर्माच्या ध्वजाखाली विर्भयपणे उभे राहिले. नामदेवरायांनी त्यांना मंत्रोपदेश देऊन कृतार्थ केले. चोखोबा एका अभंगात म्हणतात-

धन्य धन्य नामदेव । माझा निरसला भेद । विठ्ठल मंत्र त्रि अक्षरी । खूण सांगितली निर्धारी । ठेवोना माझ्या हात । दिले माझे मज हित । दावियले तारु । चोखा म्हणे माझा गुरू ।

आणखी एका अभंगात नामदेवरायाबद्दल म्हणतात-

भक्तिभाव मज तुम्ही दाखविला । आनंद सोहळा सुखाचि या । ते प्रेम मज न ये सांगता । कोंदाटलो चित्ता सुखानंद । रुपी दृष्टी धाम पाहता न समाये । बोलताविन ये काय करू । चोखा म्हणे धन्य नामया तु गुरु । फेडिला आधारु जीवित्वाचा ।

श्रीसंत चोखामेळा महाराज



शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा

चोखोबांना श्री नामदेवरायांनी अनुग्रह देताना 'विठ्ठल' या तीन अक्षरी मंत्राचा उपदेश दिला होता. आपल्या सद्‌गुरुवर विश्वास ठेवून चोखोबांनी अखंड साधना चालू ठेविली. आपले ध्येय गाठीपर्यंत त्यांनी निष्ठेने नाम सोडले नाही. चोखोबा आपला भाव प्रगट करताना म्हणतात -

भावची कारण भावयी कारण । भावे देव शरण भाविकासे । निजमास बळे घाली तसे वेढा । देव चहू कडे कोंडियेला । चोखा म्हणे देव भावाचा बांधला । भक्ताचा अंकिता म्हणूनि झाला ।

**चोखोबांची नामनिष्ठा :**

लोकहो, इतर साधनांच्या खटपटीत न पडता नामाचाच आश्रय धरा असे चोखोबा सांगतात - नामाचे चिंतन माझे हे अनुष्ठान । या परते साधन न कळे काही । नामचि सार नामचि सार । उतरेल भवपार पैलतीर । आणिक सायास नको काया क्लेश । नामाविण सोस करू नको । चोखा म्हणे भरवसा नामाचा । जेथ कळिकाळाचा रीघ नाही । नामाचे महत्त्व चोखोबानी जागोजागी आपल्या अभंगातून गाइले आहे.

*एखाद्या महान माणसाची मते अमान्य असू शकतात, पण त्याची महानता नव्हे.*

चोखोबारायांना अखंड संत संग होता. पंढरपुरी वास्तव्य, चंद्रभागेत स्नान, महाद्वारी उभारून नाम चिंतन, सद्‌गुरूच्या ठिकाणी निस्सीम भक्ती व दृढभाव या साधनांनिशी त्यांनी गुरूचरणांची उपासना केली व कृतार्थ झाले.

नामाच्या अभंगातून चोखोबांच्या आत्मानुभवाचे प्रतिबिंब दिसते. नामा परता मंत्र नाही त्रिभुवनी। पाप ताप नयनी न पडेची। चोखा म्हणे माझा भोळा भाव देवा। गाईन केशवा तुझे नाम। सुलभ सोपारे विठोबाचे नाम। आणिक नाही वर्म दुजे काही। अखंड नामाचे चिंतन सर्व काळ। तेणे सफळ संसार होय जना। अवघ्या साधनांचे सार। रामकृष्ण हा उच्चार। नामामृत पाठ घेई का गुटिका। होईल सुटिका संसाराची। न लगे अधिकार वर्णावर्णधर्म। नाम परब्रह्म येची अर्थी।

नाम धारण करणारा आपल्या नामरूपी साधनाला व उपास्थ देवतेला एकनिष्ठ व भावनिष्ठ असतो. कसाही प्रसंग आला तरी तो आपल्या निष्ठेपासून ढळत नाही. परमेश्वरावर त्याची अढळ श्रद्धा असते व त्याचा एकविध भाव देवाच्या पायी दृढ असतो. कलियुगात नाम साधने-वाचून दुसरे अन्य साधता नाही, ही गोष्ट संतानी ओळखून सामान्य जनाला नाम मार्गाकडे लाविले. चोखोबा सांगतात-

आमुचा आम्ही केला भाव बळी । भावे वनमाली आकळिला ।

**चोखोबांचे गृह जीवन :**

या बद्दल तपशील मिळत नाही. चोखोबा संसाराला लागणारे द्रव्य व इतर गोष्टी सामान्य माणसासारखेच करीत असत. तथापि, ते संसारातील गोष्टीत रममाण होऊन वा आसक्त होऊन राहिले नव्हते. अन्यथा श्री पांडुरंगाला ते जवळ करु शकले नसते.

मेलेली ढोरे ओढताना देव त्याना साहाय करी, असे बहुतेक संतांच्या अभंगातून वर्णिले गेले आहे. शेतीवाडी करणे, ढोरे ओढणे, घाण काढून साफसफाई करणे ही जातीची कामे ते मन लावून करीत. मात्र ते निष्काम कर्म योगी व नामनिष्ठ असल्याने केले जाणारे प्रत्येक काम हे पांडुरंगाचेच आहे असे समजून ते करीत. संसाराबद्दल चोखोबा म्हणतात -

असोनी नसणे संसाराचे ठायी । हाचि बोध पाही मना घ्यावा । घरदार वोटवटे अवघे फळकटे । दु:खाचे गोमटे सकळही । नाशवंतासाठी रडती रांडापोरे । काय त्याचे खरे स्त्री पुत्र ।

सुदैवाने त्यांना पत्नी सुस्वभावी लाभली होती. तिलाही हरिभक्ती आवडे. पतीच्या भक्तिमय जीवनात ती एकरूप झाली होती. चोखोबांच्या सहवासात तिच्याही भक्तीला बहर आला. ती पण अभंग करू लागली. तिच्या अभंगात तिच्या पापभीरू, सरळ, निष्कपट, अंत:करणाचे प्रतिबिंब उमटलेले आढळते. तिचा भाऊ बंका; बंका चोखोबांचे शिष्य झाले. त्यांनाही संतांच्या सभेत मानाचे स्थान होते. त्यांच्या अंत:करणातील भाव भक्तीला चोखोबांनी प्रेरणा दिली. ते पण अभंग करू लागले. चोखोबांनी आपली बहीण निर्मला बंका महाराला दिली. निर्मल पण चोखोबाप्रमाणे भक्तिभावाची उपजत देणगी घेऊन जन्माला आली होती. तिचेही अभंग प्रसिद्ध आहेत.

चोखोबांना दीर्घकाळ पर्यंत मूल बाळ नव्हते. विठ्ठलाच्या प्रसादाने त्यांना मुलगा झाला. त्याचे नांव कर्ममेळा असे ठेविले. बाळंतपणाच्या वेळी घरात दुसरे कोणीच नव्हते. सोयराबाई एकट्याच होत्या. चोखोबा आपल्या बहिणीस आणण्यासाठी तिच्या गावी गेले. प्रसूतीची वेळ समीप आली. अशा अडचणीच्या वेळी पांडुरंगाने निर्मलेच्या रुपाने त्यांच्या घरी येऊन सोयराबाईचे बाळंतपण केले. मुलाचे बारसे केले व गोड कौतुकही केले. नामदेवरायांच्या अभंगात देवाने बाळंतपण केल्याचा उल्लेख आहे.

*स्वत:च्या चुकांकडे दुर्लक्ष केलं तर सत्य तुमच्याकडे दुर्लक्ष करते.*

कर्ममेळा वडिलां सारखाच विठ्ठल भक्त होता. तो ही अभंग करू लागला. त्याचे अभंग म्हणजे देवाजवळ मांडलेल्या कैफियती होत. तो विठ्ठलाला म्हणतो -

आमुची केली हीन याती । तुज का न कळे श्रीपती। जन्म गेला उष्टे खाता । लाज न ये तुमचे चित्ता । हीनत्व आम्हासी हीनत्व आम्हासी । हीनत्व आम्हासी देवराया । धड गोड कधी न मिळेची अन्न । सदा लाजिरवाणे जगामधे।

सोयराबाई देवाच्या ध्यानात तल्लीन होऊन म्हणते-

अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग । मी तू पण गेले वाया । पहाता पंढरीच्या राया । नाही भेदाचे काम । पळोनी गेले क्रोध काम । देही असोनी विदेही । सदा समाधिस्त पाही । पाहाते पाहाते गेले दुरी । म्हणे चोख्याची महारी ।

वरील अभंगावरून अद्वैत तत्त्वज्ञानाची तिला चांगलीच जाण असलेली दिसते शेवटच्या ओळी याची साक्ष देतात. निर्मला चोखोबाची बहीण. तिने पण अभंग रचना केली आहे. ती एका अभंगात म्हणते -

मज नामाची आवडी । संसार केला देशधडी । सांपडले वर्म सोपे । विठ्ठल नाममंत्र जपे । नाही आणीक साधन । सदा गाई नारायण । निर्मला म्हणे देवा छंद एवढा पुरवाव ।

चोखोबाबद्दल बंका आपल्या अभंगात म्हणतात-

सुखाचा सागर चोखा हा निर्धार । काय मी पामर गुण वानु । धन्य प्रेमपान्हा पाजूनिया माते । केले असे सरते आपणामाजी । आनंदी आनंद दाविलासे डोळा । दिली जीवन कळा माझी मज । बंका म्हणे माझी प्रेमाची माऊली। कृपेची साउली केली मज ।

गुरू परंपरा सांगताना बंका म्हणतात - ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर माऊली । खेचरू वोळली कृपा सिंधु । ज्ञानदेवा चरणी खेचर शरण । नामदेवा पूर्ण कृपा केली । नामदेव हात चोखियाचे शिरी । विठ्ठल ती अक्षरे उपदेशिले । बंका म्हणे माझा चोखा गुरू माऊली । तयाचे पाउली लोटांगण।

ही पांचही संत मंडळी एकाच कुटुंबातील. या पांचानीही अभंग रचना केलेली आहे. हे विशेष होय. एकाच कुटुंबात असा योग क्वचितच आढळतो. ज्ञानेश्वरांच्या शिकवणूकीची छाप या कुटुंबियावर विलक्षण पडली असल्याचे जाणवते. संसारात राहून हरि प्राप्तीचा लाभ करून घेणे हे साधारण काम नाही. चोखोबांनी ते करून दाखविले. त्यांनी पांडुरंगाला साक्ष ठेवून आपल्या हृदय अंगणात भक्तीचे रोपटे लावले. कर्मठ लोकांकडून होणारी अवहेलना व छळ याचे त्याला खतपाणी घातले. कुटुंबियांनी या रोपट्याची जोपासना केली. शेवटी या रोपट्याचे एका प्रचंड भक्तिवृक्षात रूपांतर झाले. त्याच्या विस्तीर्ण छायेत बसून चोखोबा देवाला आळवीत असत.

कर्माते वाळीले धर्माते वाळीले । सर्व हारपले जेथिचे तेथे । विधी ते वाळीले निषेधागिळीले । सर्व हारपले जेथिचे तेथे । वेदाते वाढीले शास्त्राने वाळीले । सर्व हारपले जेथिचे तेथे । चोखा म्हणे माझा संदेह फिटला । देहीच भेटला देव आम्हां ।

**अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी झालेले प्रयत्न :**

एकनाथ महाराजानी कर्मठांचा छळ सोसूनही समाजातील कर्मठपणा घालविण्यासाठी भगीरथ प्रयत्न केले. पैठणमध्ये त्याकाळी अस्पृश्यांची सावली सुद्धा कर्मठांना असह्य होई. नाथांनी आपल्या वाणीने आणि कृतीने मोठ्या धैर्याने कर्मठपणा घालविण्याचा फार मोठा प्रयास केला. अस्पृश्यता हा सामाजिक कलंक आहे तो नष्ट झालाच पाहिजे असे नाथांना वाटे.

अखिल हिंदूंची एक प्रबल संघटना असावी. उच्चनीच भेद गाढून टाकले. अशी त्यांची शिकवण होती. कर्मठांना ते आवडत नसे. ते नाथांना अखेर पर्यंत विराधच करीत राहिले. नाथांनी आपले प्रयत्न न सोडता ते अधिक

नेटाने कार्याला लागले. उच्चनीच भेद भाव, अस्पृश्यपणा या गोष्टी हिंदू समाजाचा नाश करतील हे ते ओळखून होते. भूतमात्राच्या ठिकाणी ईश्वराचे अस्तित्व पाहावे ही गोष्ट त्यांनी आपल्या अंता पर्यंत पाळली.

कडक उन्हात व तप्त वाळूत असहायपणे रडत असलेले महाराचे पोर कडेवर घेऊन - महारवाड्यात नेऊन त्याच्या आईकडे पोचविले. पाण्यासाठी जीव कासावीस होऊन तडफडणाऱ्या गाढवाच्या तोंडात गंगाजल घातले. राणू महाराकडे त्याच्या घरी जाऊन तेथे जेवले. श्राद्धाच्या दिवशी आलेल्या महारांना ब्राह्मणांच्या अगोदर जेवू घातले. या सारखी कृत्ये मोठ्या धैर्याने कडव्या कर्मठपणाच्या प्रतिकाराला न जुमानता त्यांनी केली. चोखोबांचे हद्गत आणि इतर अस्पृश्य समाजाचे मूक रूदन त्यांच्यासमोर होते.

या नंतरच्या कालावधीत या बद्दल विशेष प्रयत्न झालेले दिसत नाहीत. मात्र १९ व्या शतकाच्या मध्यावधीच्या काळात महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी आपल्या परीने पुष्कळ प्रयत्न केले. त्यासाठी चळवळ उभली केली.

यानंतर महात्मा गांधीनी या कार्यास देशव्यापी स्वरूप देऊन दलितांचे दु:खे हलकी करण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस संत गाडगे महाराज यांनी कार्यास सुरूवात केली. ते परीट समाजाचे असल्याने कपड्याबरोबर मनोमालिन्य पण साफ व स्वच्छ करून टाकण्याचा त्यानी उपक्रम सुरू केला. समाजाला ईश्वर भक्तीकडे वळविण्याचा प्रयत्न केला. चोखोबा बद्दल त्याना नितांत आदर होता. १९१७ साली पंढरपुरात त्यांनी चोखोबा यांच्या स्मरणार्थ अस्पृश्यांसाठी एक धर्मशाळा बांधली.

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाजाच्या उद्धारासाठी अहोरात्र कष्ट केले. याच काळात साने गुरुजींना हे जग पुण्यमय व मंगलमय व्हावे असे सतत वाटत असे. त्यांनी सत्याग्रहाच्या द्वारे अस्पृश्याना पंढिरायाच्या मंदिरात प्रवेश मिळवून दिला.

भारत स्वतंत्र झाल्यावर भारत सरकारने १९५५ साली कायद्याने अखिल भारतातील अस्पृश्यतेचे उच्चाटन केले.

**संत चरित्रे व त्यांचे कार्य :**

संतांची चरित्रे आपणास मार्गदर्शक आहेत. वाट चुकलेल्या लोकांस ते योग्य मार्गाला लावतात. दुष्टांचा दुष्टपणा घालवून त्याला सन्मार्गाला लावतात. संत बुद्धीचे डोळे उघडतात. आपले निजरूप पाहण्यास शिकवितात. त्यांच्या संगतीत विषयवासना मावळतात. हरिप्रेमाने ते अंतर्बाह्य रंगलेले असल्यामुळे त्यांच्या संगतीत प्रेम सुख भोगण्याची पात्रता भाविकांच्या आंगी न कळत निर्माण करतात. पात्रता सिद्ध होताच पूर्ण कृपा करतात. सत्संग, संतसेवा व संतकृपा हे श्रीहरीच्या मंदिरात शिरण्याची तीन दालने आहेत. विषयाच्या महानिद्रेतून संत मानवाला जागे करतात, काय संतांचे मानू उपकार । मज निरंतर जागाविती। संत संगाची सफलता म्हणजेच सद्‌गुरूकृपा. आरंभी संत संग व शेवटी गुरूकृपा. संत, सद्‌गुरू व देव हे वस्तुत: अभिन्न आहेत.

संत महातमे स्वत: निर्मळ व धर्मशील असे आचरण करून सामान्य लोकांना आदर्शभूत होतात. भेदाभेद, द्वेष, मत्सर इत्यादि अवगुणांचा नायनाट करून दया, सहिष्णुता, परोपकार, मानवता इत्यादी सद्‌गुणांची कास धरण्यास ते आम्हांस प्रवृत्त करत असतात.

यासाठी संत चरित्रांचा अभ्यास करणे अनिवार्य आहे.

**शं. बा. मठ**

६, कुमार आशिष, राम मारुति रोड,
ठाणे - ४०० ६०२.

*शरीर पाण्याने, मन सत्याने तर आत्मा ज्ञानाने पवित्र होतो.*
*अति लोभामुळे सर्वस्व जाण्याची वेळ येते.*

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*शुनःशेप आख्यानाचा संदर्भ घेऊन केलेले विवेचन हा लेखमालेतील पुढील लेख आहे. - संपादक*

**प्रास्ताविक :**

दिशा मासिकाच्या (विद्या प्रसारक मंडळ, ठाणे) जानेवारी, फेब्रुवारी व मार्च २००८ च्या अंकात, आपण ऋग्वेदातील शुन:शेप आख्यानावर चर्चा केली.

पुन्हा एकदा ह्या विषयाचे जे विलक्षण महत्व आहे. त्याची आठवण करू या.

वेदिक वाङमयामधील 'आख्यान' ह्याला कमी महत्व देण्याची मानसिक भूमिका एका बुद्धिवादी (Rational thinking process) विचार पद्धतीतून उद्‌भवते. पाश्चात्य आधुनिक सांस्कृतिक मानसिकता 'Myth, Metaphor' ह्यांना कमी प्रतीची सत्यता बहाल करतात. 'Reality' म्हणजे सत्यता, ह्याची व्याख्या Modern Science च्या, आधुनिक विज्ञानाच्या तात्त्विक भूमिकेवर आधारलेली असते.

पण, Thomas Kunh थॉमस कुन्ह ह्याच्या 'Paradigm' पॅरेडिम संकल्पनेप्रमाणे ही एक एकांगी व अपूर्ण ज्ञानपद्धती होय. शिवाय, ती ज्या समजूती, विश्वास, पूर्वग्रह व एकांगी मानवी विचार धारेवर आधारलेली असते, त्यामुळे संपूर्ण ज्ञान, गूढ ज्ञान व विशेषत: मानवी बुद्धीच्या पलीकडील कोडी उलगडत नाहीत, असे त्यांच्याच संप्रदायाचे सांस्कृतिक विद्वानांचे मत आहे. ईश्वर आहे किंवा नाही, विश्वाची निर्मीती, मानवी व इतर जीवांची पृथ्वीवर होणारी जीवसृष्टी, त्यांचे ग्रह, तारे व इतर विश्व यांच्याशी 'नाते', जन्म, मृत्यू ह्यांचे पूर्ण ज्ञान जीवनाचे सातत्य व ध्येय किंवा उत्क्रांतीची दिशा, ह्याबद्दल ही वैचारिक बुद्धीवादी पाश्चात्य संस्कृती अंधारात धडपडत असतांना दिसते आहे !! एवढेच नव्हे, तर त्यांनी दूसऱ्या बाजूला राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थांवर हुकमत मिळवून इतर ज्ञानपद्धतींचा, असहिष्णू वृत्तीने कोंडमारा चालवला आहे. त्यामुळे, सामाजिक संपत्तीवर, एका एकांगी भोगवादी संस्कृती लादून वारेमाप उधळपट्टी चालवून Comman Resources सार्वजनिक साधनसंपत्तीचा ओघ इतर मार्गांना बंद ठेवला आहे. अर्थातच, हा खेळ सामाजिक बुद्धीभेद व भ्रम करून चालला आहे !!

**महत्वाची जीवन मृत्यू कोडी :**

ही टीका अशासाठी कीं मानवी समाजाचे जे महत्त्वाचे (आध्यात्मिक, भावनिक व भौतिकही) जीवन-प्रश्न अनुत्तरित आहेत व जे युगायुगाच्या एका सातत्याने जगभरची सामान्य जनता हाताळत आहे त्यांना 'ही सत्ता' त्यांच्याच साधन संपत्ती व प्रश्नांपासून वंचित ठेवीत आहे.

**शुन:शेपची यज्ञ धडपड :**

ह्याचा संदर्भ पुन्हा एकदां 'शुन:शेप' आख्यानाकडे वळल्यावर लागेल.

'शुन:शेप' हा एक प्रातिनिधिक मुमुक्षु म्हणजे आत्मज्ञानाच्या इच्छेने भारलेला जीव, स्वत:च्या आत्म्याचे काय व कोणते पाश आहेत ते जाणूं इच्छितो आहे. आणि, त्या पाशांपासून मुक्तता मिळवूं इच्छितो आहे. आधुनिक विज्ञान फक्त शरीरालाच सत्य मानीत आहे. ही आहे त्यांची Objective Reality !!

ही धडपड काय फक्त शुन:शेपची आहे ? ही तर सगळ्या मानवजातीची प्रातिनिधीक (Aspiration) इच्छा व आकांक्षा व धडपड आहे.

ह्या इच्छेचा 'स्तर' दूसऱ्या कुठल्याही सामाजिक

प्रश्नांच्या नक्कीच वरील पातळीचा ठरावा. शिवाय तो सुटण्यांकरितां मानवी समाजाच्या सध्याच्या ज्ञान विज्ञानाच्या व साधनसामुग्रीच्या चौकटीत व ताकदीत न गवसणारा ठरावा!!

**<u>माझी मांडणी :</u>**

मग, हा प्रयत्न तो (शुन:शेप) ज्या पद्धतीने सोडवूं पहातो आहे, त्याचे हे 'आख्यान' आहे. जगातल्या अत्यंत प्राथमिक मानवी प्रयत्नांच्या इतिहासांतले निवेदन आहे. ऋग्वेदांतील आहे. मानवी अस्तित्वाची प्रतिष्ठा वाढविणारे आहे.

राजसूय यज्ञ व सोमरसाची प्राप्ति ही त्याची वेद संहितेतील सांगितलेली साधना, व तपस्या आहे. त्या तपस्येत योगमार्गातील 'उध्वरेत कुंडलिनी' जागरण, त्रिवर्ग्य (त्रेताग्नि) यज्ञ साधना, श्रीविद्या व सोमयागाची यज्ञकृती यांची आधारभूत व सूचित अशी साधना, वृत्ती व तपस्या आहे.

आतां ही माझी मांडणी जरी कुणाला मान्य नसेल तरी ह्या प्रश्नाची व उद्योगाची दखल घेऊन तिचा पाठपुरावा करण्याची योग्यता नाकारता येणार नाही !!

खंत आहे, कीं या प्रश्नांची ती केवळ भारतीय संस्कृतीची मांडणी आहे म्हणून आणि, सध्याच्या वैज्ञानिक ज्ञानपद्धतीने ती वाळीत टाकली असल्याने. सगळी आधुनिक मानवी संस्कृती तिच्याकडे पाठ करून हेळसांड करीत आहे असे दृश्य दिसत आहे.

**<u>''Concept of SOMA''</u> :**

आपल्या शुन:शेप आख्यानाने 'सोम' ह्या पूर्णपणे वेदिक संकल्पनेचे एक गूढ व 'सोमरस प्राप्ति' आणि 'सोमरस' 'पिण्याची क्रिया', याबद्दल प्रचंड उत्सूकता निर्माण केली आहे.

संतोष क्रिन्सकी (**Santosh krinskey**) हे एक अमेरिकेतील विद्वान स्पिरीच्यूॲलिस्ट आहेत. त्यांनी 'लोटस लाईट पब्लिकेशन्स' (विल्मोस्ट) U.S.A. हया संस्थेची स्थापना केली. त्यांचा मुख्य विषय भारतातील स्पिरीच्यूअल ज्ञान व लिखाण हा आहे. तसेंच ते योगी अरविंद घोष, (पाँडिचेरी) ह्यांचे व मदर यांच्या New Consciousness ह्या संकल्पनेचे व चळवळीचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी 'सोम' ह्या संकल्पनेबद्दल काय लिहीले, ते पहा.

''It is necessary to recognise the importance of the concept of Soma underlying all these attempts. The veda stresses the invocation of soma as absolutely necessary to the seeker, who hopes to attain true realization. Eventnally it is therefore necessary to go behind the veil to the secret meanigns of soma.'' (P.III Versatile Genius - SRI T.V. KAPALI SHASTRIAR - 1986, Dipti publications Poudicherry - 605002)




'ज्यांना सत्य अनुभूती प्राप्त करावयाची आहे त्यांना सोमाची सिद्धी आवश्यक आहे. त्यामुळे, सरते शेवटी सगळ्या भ्रमांच्या व बुरख्यांच्या पिछाडीला जाऊन सोम या संकल्पनेचे गुत्प रहस्य शोधलेच पाहिजे - जाणलेंच पाहिजे.

**सोमरस प्राप्ति अनेक प्रयत्न :**

पण, या शोध घेणाऱ्या चळवळींचे किती प्रकार झाले ते पहाणे मनोरंजक वाटेल व त्यांतही मानवी प्रयत्नांची वेगवेगळी रूपे व साधना पाहून अचंबा वाटेल. अशी परिस्थिती आहे.

**सुश्रुत संहिता :**

अध्याय २९ हा संपूर्णपणे 'सोम संकल्पनेला' वाहिलेला आहे.

ब्रह्म व इतर देवांनी सोम ह्या अमृतासारख्या कल्पनेचा शोध लावला व निर्मिती केली. मृत्यू व वृद्धत्व ह्यावर रामबाण उपाय आहे. २४ तऱ्हेच्या वनस्पती आहेत ह्या दिव्य सोमाच्या अंशुमन, मुंजवान, चंद्रमा, रजनप्रभा, दूर्वा सोम, कनियान, स्वेताक्ष, कनकप्रभा, प्रातनावन, तालव्रंत, अंमसावन, स्वयंप्रभा, महासोम, गरुडहूत, गायत्रक, त्रैस्टुभ, पंक्त, जगत, सांक्वर, अग्निस्तोम, रैवत, गायत्र्य, त्रिपक्ष, उडूपति (XXX, 2 - 8)

ह्यांतील आश्चर्यकारक बाब म्हणजे यातील कोणतीही वनस्पती घेतली तर तिला १५ पाने आहेत व ती पाने चंद्राच्या कलेप्रमाणे लहान मोठी होतात वा वाढतात. शुक्ल पक्षात एक एक पान एका दिवशी येऊन पौर्णिमेला १५ संख्येने भरतात. या उलट वद्य पक्षात या उलट क्रमाने गळून पडत शेवटी अमावास्येला फक्त वेलीची फांदी किंवा खोड फक्त शिल्लक रहाते. (XXX, 20 - 22)

ह्या सर्व वेलींना पांढरा द्रवासारखा जीवनरस प्राप्त असतो. हे सर्व वर्णन वाचल्यावर असे वाटेल कीं कोणी तरी ह्या वनस्पती प्रत्यक्ष पाहिल्यावर हे लिहीले आहे. पण, असे दिसत नाही. कारण, ह्याच ग्रंथात पुढील श्लोक आहे.

**''येश्वात्र मन्दभार्ग्यस्ते भिषजश्चापमानित:।**

**न तान् पश्यन्त्य धर्मिष्ठा: कृतघ्नाश्चापि भानवा: ।।**

**भेष जव्दे षिणश्चापि ब्राह्मणव्देषिणस्तथा।**

**(XXIX - 32)**

''सोम वनस्पती ह्या अशा लोकांना अदृश्य आहेत, कीं जे ब्रह्मणद्वेषी आहेत, ज्यांना त्यांतील रोग निवारण गुणांवर विश्वास नाही.''

ह्या उताऱ्यावरून असे दिसते कीं वनस्पतींचे हे वर्णन गूढ, गुत्प व कल्पनाशक्तीला आवाहन करणारे आहे.

तसेंच ऋग्वेद मंडल १०.८५.३ मध्ये असे म्हणले आहे कीं सोम (वेल) चिरडणाऱ्या माणसाला असें वाटते कीं त्याने त्यापासून सोमरस प्राशन केला आहे, पण ज्याला ब्राह्मण किंवा ऋषी सोम असे जाणतात, ते दूसरे कोणीही पिऊं शकत नाहीत.

**(सोम यं ब्रह्माणो विदुर्न तस्थाश्नाति कश्चन):**

भगवद्गीतेत वचन आहे, ''**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा । पुष्णामि चौषधी: सर्च: सोमोभूत्वा रसात्मक: ।।**''

तसेंच पृथ्वीमध्यें प्रवेश करून, आणि रसात्मक सोम (चंद्र) होऊन सर्व औषधींचें म्हणजे वनस्पतीचे पोषण करितो. (लो. टिळक).

**शतपथ ब्राह्मण :**

शतपथ ब्राह्मणातील वर्णन एक निराळे दर्शन 'सोम' या संकल्पनेचे देते.त्यातील वर्णन असें कीं देवांना यज्ञात देण्यात येणाऱ्या 'अन्न' (हवि) त्याच्याच मनात असे आले कीं मी सर्वच्या सर्व स्वत: अन्न होऊ इच्छित नाही. त्यामुळे त्याच्या सर्वस्वाचा जो भाग अत्यंत आनंददायी तो त्याने वेगळा केला. त्यामुळे देवांना विजयानंद झाला. 'आतां

तूं आमचे भक्ष होऊं शकतोस' तेव्हा त्याने हा भाग शोषून घेतला व त्याचे नांव 'सोम' असें पडले. **(स्वा वै मऽएषेति तस्मात सोमो नाम)**. (शतपथ III - 9. 4. 22)

'सोम' या संकल्पनेचा वैश्विक अर्थ ऋग्वेदातील काही ऋचामधून प्राप्त होतो. उदाहरणार्थ ऋचा (IX - 83 - 3)पहा तिचा इंग्रजी अनुवाद व भाष्य महत्त्वाचे आहे म्हणून तसेंच देतो.

''The associate of dawn, and the sun (i.e. divine elixir) Shines forth, it sprnkles the daw drops to nourish the worlds with food provisions; by its super - intellect, it supports the entire intelligentsia, the elders, the beholders of men; it supports the germ of entire activity in the world.'' **(आर्यसमाजी भाषांतर)**

योगी अरविंदाचे भाष्य आणखी प्रकाश टाकते. Soma is regarded as the dappled Bull also **(अससचदुषसः पृश्निरग्निय उक्षा विभर्ति वाजयुः । (Ix - 83 - 3)** The word prsnih **पृश्निः** dappled, is used both, of the bull, the supreme Male, and of the Cow, the female Energy. Like all words of colour, sveta, sukra, hari, krsna, hiranyaya in the veda, the word 'prsnin' is also symbolic.

Colour, Varna, has always denoted quality, temperament etc. (guna, karma, svabhava) in the language of the vedic mysticism. The dappled Bull is the Deva in the variety of his manifestations many hued soma is that first dappled Bull generator of 'the world of becoming, for from Ananda, from the all - blisful one, they all proceed; soma is this Bull **(UKsan उक्षन)**, a word like vrsan, **वृषन,** means diffusing, generating, impregnating, the father of abundance, the Male; it is he who fertilizes force of consciousness (उक्ष् सेचने; उक्षव सेचन्ते - Daya; उक्षन महन्नाम Nigh III - 3); वृषा वर्षकः, वीर्यसेषकः (Daya).



M. M. Siddheshwar Shastri Chitrao

याच ऋचेचे **डॉ. चित्रावशास्त्री** यांचे भाषांतर असे-

''कुशल लोकांना जन्म देणाऱ्या, पर्जन्यकारक, अन्नोत्पादक आणि प्रकाशमान सूर्यरूपी सोमाने अंगिरसादि पितरांचा गर्भ निर्मिला.''(p-६०१)


**<u>माझा अन्वयार्थ अनुभूती जन्य :</u>**

या ठिकाणी थोडा श्वास घेणे आवश्यक ठरावे. सामान्य वाचकाची, या अनेक विद्वानांची, विचारवंतांची, योग्यांची भाष्ये वाचून, दमछाट होण्याची शक्यता आहे.

माझ्या मते ही मंडळी आपल्या पूर्वजांच्या पासून प्राप्त झालेल्या थोड्याश्या तुटक व थोड्याश्या गुहय ज्ञानाची प्राथमिक चाचणी करण्यांत गुंतली आहेत. पण हे पुरे पडणार नाही. 'सोमाच्या' अनेक स्वरुपांची वर्णने वाचूनही त्यापासून खरा बोध होण्यासाठी 'सोमाच्या' अनुभूतीची - (अपरोक्ष अनुभूतीपाशी पोंचण्याची) नितांत आवश्यकता आहे.

त्यासाठी ज्या कृती किंवा क्रिया किंवा यंत्रणेने, व्यूहरचनेने 'सोम' निर्माण होतो किंवा तसा तो झाला ते स्वत: जाणणे व अनुभवणे आवश्यक आहे. !!

ह्यासाठी, ह्या विश्वाची निर्मीती व सृष्टीची निर्मीती कुठल्या क्रमाने, यंत्रणेने, कोणत्या व्यूह रचनेने झाली याची निदान पुसटशी कल्पना डोळ्यासमोर आणणे आवश्यक आहे.




HIS HOLINESS SHREE SWAMI VISHNU TIRTH

यासाठी आपण पुन्हा एकदां **<u>स्वामी विष्णुतीर्थ महाराज</u>** यांच्या **'<u>देवात्मशक्ति</u>'** ह्या पुस्तकाचा आधार घेऊं या.

**<u>उत्पत्तिचक्र</u>** ह्या संदर्भात ते सांगताहेत.

**<u>Devalution and Evolution</u> :**

आत्म्याच्या सृजनशक्तीचे (Creative Powers of the Soul) रुप म्हणजे सृष्टि आहे. अपक्रांति आणि उत्क्रांति (Devolution and Evolution) असे सृष्टीचे दोन भाग आहेत.




चक्रांच्या आत दुसरी चक्रे असावीत तशी चक्रे विविध भूमिकेवर या प्रभव आणि अप्ययांची चक्रे आहेत.

**१) <u>जगत चक्र</u> :**

यापैकी पहिले शिवतत्वापासून सृष्टीरूपाने अविर्भूत झालेले **<u>जगत् - चक्र</u>**. याची परिणति अखेरच्या **<u>भौतिक - पृथ्वीतत्वापावेतो</u>** होऊन ते परत **<u>फिरुन मूळ तत्वात</u>** सामावते.

**२) <u>मनोविकासात्मक चक्र</u> :**

यानंतर मनोविकासात्मक दुसरे चक्र होय. त्यांत **प्राण तत्वाच्या उभ्दिज कोटीपावेतो** विकास होतो व परत उभ्दिजकोटीकडून उत्क्रांतीनुसार पहिल्याने **प्राणिकोटि** व मग **मानवी जीवनकोटीपर्यंत** शेवट होतो.

**३) <u>आत्म्याचे पुनरावर्तनरुप चक्र</u> :**

याशिवाय तिसरे चक्र आहे. ते म्हणजे आत्म्याचे पुनरावर्तनरुप चक्र होय. यांत **व्यक्तिश: जीवात्मे एका योनीतून दुसऱ्या योनीत जात असतात**. अनेक योनींतील **शरीरे ही त्यांची वाहने होत**.

**४) <u>बीज शरीर व त्याचा विकास</u> :**

आतां चौथे चक्र म्हणजे **एकाच योनीच्या पूर्णावयवी शरीरापासून बीजाची उत्पत्ति** आणि बीजरुपापासून परत **पूर्ण शरीराचा विकास.** सर्व बीजामध्ये सर्व तपशीलासह आपल्या सारखेंच **<u>दुसरे जिवंत शरीर</u>**

**निर्माण करावयाची शक्ति** असते. प्रत्येक वृक्ष आपल्या स्वत:पासून आपल्याच जातीची अगणित बीजे निर्मीतो. तव्दतच पशु व मानव यांत नर व मादी शरीरातं पू व स्त्री बीजे असतात ती संयोग पावून स्वजातींची नूतन रुपे प्रसवतात. **प्रत्येक पिंड हे चिमुकले बह्मांडच आहे**. ब्रह्मांडाची जी पिंडात अपक्रांति झालेली आहे ती उत्क्रांति पद्धतीप्रमाणे व्यक्तिश: ब्रह्मांडात परिणत करणे हेच मानवी साध्य होय.

ह्या मांडणी व पृथक्करणाचा व वर्गीकरणाचा फायदा असा होईल कीं आपल्याला 'सोम' या संकल्पनेचे जे जे संदर्भ गोंधळात टाकणारे वाटतात, त्यांची ह्या '४ चक्रांत किंवा व्यूहरचने वांटणी करता येईल, व मग सोमाच्या प्रभावी कार्याचा अंदाज लागेल.

<u>बुद्धीला प्रतिभा</u> :

सोमाच्या विश्वनिर्मीतीच्या कार्यातला हातभार हा 'विद्वान, बुद्धी, अंगीरस' निर्माण करण्यात व एकंदरच सृष्टिची निर्मीती करण्यात दिसेल.

<u>वनस्पतींना औषधीतत्व</u> :

त्यामुळे चंद्रापासून सोमरसाची प्राप्ति वनस्पतींना होते हा क्रम विश्वरचनेतील ग्रह, तारे, पृथ्वी व वनस्पती किंवा इतर जीवसृष्टी ह्याच्यामधला व्यवहार होय. सध्या जरी तो अगम्य, अनाकलनीय वाटला, तरी पण त्या कृतीची एक वर्गवारी निश्चित झाली.

<u>मानवी पिंडात उपक्रांति</u> :

आतां आपण <u>मनुष्य ह्या पिंडाचा</u> विचार करूं लागलो कीं त्याचे जे 'उत्क्रांतिचे चक्र' आहे त्यांत सोम या संकल्पनेचा संदर्भ काय, कोठे येतो ते पहावयाला हवे.

दिशाच्या मार्च २००८ ह्या अंकातले '**उर्ध्वरेत कुंडलिनी, त्रैताग्नि, सोमरसाची यज्ञक्रियेने** प्राप्ति, वगैरे क्रिया ह्यांचे वर्णन ह्या पिंडाच्या अपक्रांति व **उत्क्रांति चक्राच्या विभागात** मोडेल.

त्यामुळे 'सोम' ह्या विषयावर जे अफाट वाङमय उपलब्ध आहे. त्याचा सध्यातरी ह्या एका 'चक्राच्या सीमेत व संदर्भात विचार करणे प्रस्तुत ठरावे..

"Soma is constantly involved in the energy working in the world, it is the essence within the growths of the earth, it is the substratum of delight that permits all things to exist and manifest"

"Throngh various psychological disciplines and mystical attunements of the soul, it is possible to **<u>bring the Human Conscionsness into harmony with the universal consciousness and invoke the active, conscious movement of Soma in being</u>**."

We see the requirement of invoking 'The God Agni', Symbolically the fire of aspiration and the flame of devotion, as the first pre - requisite.

एकदा इच्छाशक्ति जागृत झाली कीं इंद्र व मरूत देवता म्हणजे वैश्विक शक्तिंना जागृत करावे लागते ज्यामुळे मन:शक्तीमध्ये मूलगाभी क्रांति होते. 'सोम' या चीजेचा हा अर्थ प्राप्त झाला कीं मनुष्याच्या मानसिक व शारीरिक क्रियांमध्ये ह्या सोमाचा अंमल जाणीवपूर्वक सुरू करण्यात माणूस यशस्वी होते. ह्या आंतरिक मानसिक आनंदाची प्राप्ति ह्या सोमरसपानाने होऊं लागली कीं माणसाची 'आध्यात्मिक प्रगती' झपाट्याने होऊं लागते.

<u>इंग्रजी संदर्भ कां ?</u>

मी मधून मधून इंग्रजी भाष्ये कां सांगत आहे? कारण, भारतीय मराठी माणसाच्या ज्ञानप्राप्तिचे दरवाजे हे

संस्कृत भाषेच्या, ऋग्वेद व इतर वेदांच्या भाषेच्या आधारावर पूर्णपणे होणे अशक्य आहे. एकतर भाषेचा व्याकरण शास्त्र व संकल्पना, प्रतीके ह्यांच्या संस्कृत व वेद या प्रकारांशी त्याचा संबध तुटला आहे. शिवाय, त्याचा ह्या भाषेतून होणाऱ्या संकल्पनाच्या सत्यतेबद्दल विश्वास नाही. पण, एखाद्या आधुनिक पाश्चात्य विद्वानाने इंग्रजी भाषेंत त्याची समज व खातरजमा दिली कीं 'ज्याला वेदिक ज्ञानपद्धतीत 'आत्पज्ञान' म्हणतात, त्या आत्पज्ञानाच्या पूर्ण विश्वासावर आपल्या मनाची, बुद्धिची व विश्वास आणि श्रद्धांची पुनर्रचना होते. ह्या विश्वास व श्रद्धेखेरीज 'ज्ञान प्रकारांच्यातील मूलगामी बदल होणे अशक्य आहे, असा माझा कित्येक तपांचा अनुभव आहे.

दूसरे म्हणजे ज्या साधना व मानसिक क्रिया व काँशसनेसमधील मूलगामी बदल ह्या अनुभूतींमार्फत होणार आहे, त्यांचा त्याला साधा परिचय सुद्धा नाही. विशेष म्हणजे ह्या क्रिया ह्या पृथ्वीवर वास्तवांत होतात व स्वत:च्या पिंडात होऊ शकतात ह्यावर विश्वास नाही. हे ज्ञान दूरान्वयाने होणे अशक्य आहे. !!

तिसरी अडचण कीं हीच परिस्थिती 'ॲटम बाँब' किंवा 'न्यूक्लियर फिशन' ह्या पदार्थ विज्ञानाच्या कृतीबद्दल आहे, पण तिथेही विश्वासाचा प्रश्न उभा रहातोच. रशियन स्पृटनिक जेव्हां प्रथमच विश्वाच्या आकाशांत भ्रमण करूं लागले तेव्हां अमेरिकन, ब्रिटिश व युरोपियन वैज्ञानिकांनीही त्याच्या सत्यतेबद्दल शंका व्यक्त केल्या होत्या. मग सामान्य माणसाची काय कथा !!

ह्या अडचणींवर मात करणे आवश्यक आहे. ज्या सोमाच्या प्राप्तिने हा विश्वास उंचावून दृढ होणार आहे त्याच सोमाच्या प्रत्यक्ष प्राप्तिमध्ये ह्या अडचणी आहेत. हे एक **दुष्ट चक्र** '**Viscious Circle**' आहे व त्याला नाईलाज आहे !!

**सोमप्राप्ति व वेदांचा अर्थ :**

तेव्हा एकदा 'सोम' ह्या शब्दातून व्यक्त होणाऱ्या संकल्पना ह्या ग्राह्य मानून त्यांना सत्य स्वरूप प्राप्त झाले कीं वेदांच्या कथनाला खरा अर्थ प्राप्त होतो.

मानवी काँशसनेसमधील एक क्रांतिकारी बदल 'मानवी फोर्मेच्या' वैश्विक प्रगतीसाठी सोमप्राप्ति व प्राशन आवश्यक आहे याची खात्री पटली कीं भारतीय संस्कृतीतील एका मोठ्या संशोधनाबद्दल आदर निर्माण होईल व त्याच्या प्राप्तिसाठी धडपड सुरु होईल.

आणि मग, मगच ह्या ज्ञानाच्या प्राप्तिसाठी वेद, उपनिषद, ब्राह्मणे, पुराणे, मंत्रशास्त्र, योग, यंत्र, तंत्र यां सर्वांची योजना कां झाली व त्यांत प्रतीकांची भाषा, गूहय भाग, साधना यांची योजना कां झाली ह्याचा अंदाज येईल. आणि, नंतरच ह्या सर्व हजारो वर्षे किंवा अनेक युगापूर्वी एका जुन्या, सनातन संस्कृतीने ह्या पृथ्वी गोलावर नवीन जन्माला येणाऱ्या जीवात्म्याच्या खऱ्या प्रगतीसाठी खऱ्या सांस्कृतिक उन्नतिसाठी ज्या रचना व योजना केल्या त्यातील शहाणपणाची. दूरदृष्टीची जाणीव होईल, महत्व दिसेल व कृतज्ञताही वाटेल.

**बुडत्याला काडी आधार :**

'शुन:शेप ह्या ऋग्वेद व इतर वेदिक, उपनिषदिक व इतर संहितेतील आख्यानाचा हा खरा उद्देश आहे. त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न हा समूहात बुडणाऱ्या, गटांगळ्या खाणाऱ्या एखाद्या क्षुद्र मानवी जीवाला एखाद्या लाकडी तराफा हाताला लागून जीव वाचण्याची शक्यता प्राप्त झाल्याच्या अनुभवासारखा जीवनदायी आहे.

**सांस्कृतिक अध:पात व अध:पतन :**

नाहीतर ह्या आधुनिक मर्त्य मानवाला ज्या सांस्कृतिक अध:पाताला व अध:पतनाला सामोरे जावे लागते आहे त्याला ह्या सर्वनाशी 'त्सुनामी' पासून संरक्षण

नाही. ह्या वैश्विक अंधकाराच्या गर्तेत ढकलणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक उलाढालीपासून संरक्षण नाही. त्याची ही जीवघेणी रसातळाला जाणारी धांव रोखावयालाच हवी. हे ह्या आख्यानाचा खरा हेतू आहे.

या आख्यानातील दर्शवलेल्या मार्गदर्शनाचा पाठपुरावा आपण पुढच्या कांही लेखात घेणार आहोत.

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे
Tel. 25368450
E mail;: yrsane@eth.net

•••

## मराठीत वापरली जाणारी विरामचिन्हे

| क्र. | चिन्हाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| १. | पूर्ण विराम | . | १) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी. २) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरापुढे. | १. तो घरी गेला. २. ता. क. (ताजा कलम) य. गो.(यशवंत गोपाळ) |
| २. | अर्धविराम | ; | दोन छोटी वाक्ये उभयान्मवयी अव्ययांनी जोडलेली असता. | ढग खूप गर्जत होते; पण पाऊस पडत नाही. |
| ३. | स्वल्पविराम | , | १) एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास. २) संबोधन दर्शविताना | हुशार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात. २) मधू, इकडे ये. |
| ४. | अपूर्ण विराम (उपपूर्णविराम) | : | वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास | पुढील क्रमांकाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले : १, ८, १४ २७, ४०. |
| ५. | प्रश्नचिन्ह | ? | प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी. | तू केव्हा आलास ? |
| ६. | उद्गारचिन्ह | ! | उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी | १)अरेरे ! तो नापस झाला. |
| ७. | अवतरण चिन्ह | ‘‘ ’’ | (दुहेरी)बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्याकरता. (एकेरी एखाद्या शब्दा वर जोर द्यावयाचा असता दुसऱ्याचे मत अप्रत्यक्षपणे सांगताना | तो म्हणाला, ‘‘मी येईन.’’ मूलध्वनींना ‘वर्ण’ असे म्हणतात. |
| ८. | संयोगचिन्हे | - | १) दोन शब्द जोडताना. २)ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास | विद्यार्थी - भांडार, प्रेम-विवाह, आजचा कार्यक्रम शाळे - पुढील पटांगणावर होईल. |
| ९. | अपसारण चिन्ह (डॅश स्पष्टीकरण चिन्ह) | - | १) बोलता बोलता विचारमालिका तुटल्यास. २)स्पष्टीकरण द्यावयाचे | १) मी तेथे गेलो, पण - २) तो मुलगा - ज्याने बक्षीस मिळविले- असल्यास आपल्या शाळेत आहे. |

*पाहिलेल्या पावसाळ्यांपेक्षा ‘अनुभवलेले’ पावसाळे महत्त्वाचे.*

# दामले सर

मुंबईच्या डी. जी. रुपारेल महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल श्री. रेशन सीताराम यांचे १० जानेवारी २००८ रोजी त्यांच्या वयाच्या ८२ वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. ही बातमी मला प्रा. मोहन पाठक यांनी दिली. मी रजेवर असल्याने दूरध्वनी करून आमच्या महाविद्यालयात कळवली. दामलेसर कसे गेले, शेवटी ते कुठे होते, कोणाकडे होते, याबद्दल प्रश्न मनात यायला लागले, पण त्याबाबतची माहिती कोणी देऊ शकेल अशी व्यक्ती सापडेना. प्रा. पाठक यांना पुन्हा फोन केला तर, त्यांनाही जुजबीच माहिती होती व ती सुद्धा दामलेसरांच्या शेजारी राहणाऱ्या भिवंडी महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या डॉ. फडके सरांनी दिली होती व डॉ. फडकेसर मला फोन करणार आहेत, असंही प्रा. पाठक यांनी मला सांगितलं. त्यांचा फोन माझ्याकडे नव्हता, प्रा. पाठकांकडेही नव्हता, म्हणून वाट पहाण्याशिवाय काहीच पर्याय माझ्याकडे नव्हता. तरीही चैन पडेना. कुठे विचारावे ? काय करावे ? या विचारात सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल आणि त्या संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळीपैकी एक. महत्त्वाचे पदाधिकारी श्री. अशोक ठाकूर यांना फोन करावा असे मनात आले. याचे एक कारण असे की श्री. ठाकूर आमच्याच महाविद्यालयात पूर्वी नोकरीला होते व त्यांनी दामलेसरांच्याच हाताखाली काम केले होते. त्यांना दामलासरांविषयी आदर आहेच, पण त्यांच्या भेटीगाठीही होत असत. दामलेसरांची एक भाची, हेमांगी, पालघर मध्येच असते व तिचे सासर व श्री. ठाकूर यांचे संबंध जिव्हाळ्याचे असल्याने, त्यांच्या व दामलेसरांच्या भेटी अथवा खबर श्री. ठाकूर यांना नेहमीच असते, हे मला माहीत होते. मी ठाकूरांना फोन लावला, पण भेट होऊ शकली नाही. शेवटी त्यांना SMS केला व गप्प बसलो. दुपारी चार वाजता मात्र दामलेसरांचे शेजारी, डॉ. फडके यांचा फोन आला, आणि वृत्तांत समजला. दामलेसर शेवटी पुण्यात होते. बहिणीकडे होते. त्यांना त्रास व्हायला लागला म्हणून हॉस्पीटलमध्ये ठेवले होते, लेरमेकरही लावला होता, पण यश आले नाही व दोनच दिवसांत त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

डॉ. फडके यांच्याशी फोनवर बोललो व वृत्तांत नीट समजला तेव्हा मला काय वाटले ? पण मी माहिती मिळवण्याच्या प्रयत्नात होतो ? मी विचारात पडलो. माणूस 'जाणून घेण्यात' इतका का उत्साही असतो ? माहिती समजते तेव्हा तगमग थांबते व जो पर्यंत ती हाती येत नाही तो पर्यंत तगमग असते असे का ? कशासाठी ? अंतयात्रेला जाणे शक्य असते तर गेलो असतो किंवा जात यावे यासाठी ही धडपड होती की शेवटी भेट नाही तरी त्यांचे शेवटचे क्षण कळावेत यासाठीची धडपड होती ? माहित नाही. इतरांच्या बाबत कदाचित असं जाणवलं नसतं, पण दामलेसरांच्या बाबतीत मात्र हे घडत होतं, त्याला एकच कारण होतं, आणि ते म्हणजे, दामलेसर एकटे होते, एकाकी होते.

त्यांना मुलबाळ नव्हतं. त्यांच्या पत्नी त्यांना सोडून लवकरच देवाघरी गेल्या होत्या. तसे त्यांना नातेवाईक मंडळी होती. ज्यांच्यावर त्यांनी व ज्यांनी त्यांच्यावर, भरभरून प्रेम केलं, मदत केली, आसरा दिला अशी भाचेमंडळी होती, पण मनाने दामले अगदी एकाकी होते. एकटे झाले होते. त्यांच्या या एकाकीपणा मुळेच मला माहिति हवी असणार ! माणूस जन्माला येतो तो एकटाच आणि इथून जातो तो ही एकटांच, हे जरी खरं असलं तरीही, देह पंचलात विलीन होईपर्यंत ज्याच्या त्याच्या देहाला माणसांची, नात्याची, बंधनाची, सख्यत्वाची, सोबतीची गरज असते व प्रत्येकजण त्यालाच चिकटून असतो. धरून असतो. पकडायचा प्रयत्न पुन:पुन्हा करीत असतो. मात्र प्रत्येकजर त्यात यशस्वी होतोच असं नाही. दामलेसर

*भोगाने तृप्ती होत नाही, भोगाने वासना वाढतात.*

शेवटच्या आयुष्यात कसे होते ? माहीत नाही, पण ते याबाबतीत शांत असावेत असं मला वाटतं.

त्यांच्या पत्नीचे दुःखद निधन झाल्यावर मी त्यांना भेटायला गेलो होतो. तेव्हा ते म्हणाले, ''अरे, तिला वाटायचं की, हा माणूस आतून 'धीट' आहे. त्याच्या मनात विचारांची अस्थिरता नाही. हे त्यांच्या मृत्यूलाही शांतपणे तोंड देतील आणि तसंच झालं.

दामलेसरांना मी १९८० साली प्रथम पाहिलं ते आमच्या ग्रंथपालन प्रमाणपत्राच्या वर्गात 'वर्गीकरण प्रात्यक्षिक' हा विषय शिकवताना. मी तेव्हा त्या वर्गाचा विद्यार्थी होते. दामलेसर मुख्याध्यापक होते. आम्हाला शिकवायला येणारे सर्वच शिक्षक कुठल्या ना कुठल्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल होते व प्रत्येक महाविद्यालयीन ग्रंथपाल आमच्यासाठी, त्या वयात प्रचंड 'मोठ्ठी' व्यक्ती होती. आदर्शन शेती, आणि दामलेसर तर मुंबईच्या प्रख्यात रुपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल होते, त्यामुळे त्यांच्या विषयीचा आदर अधिकच वाटत होता. शिवाय ग्रंथालयशास्त्रातील किचकट विषय म्हणून जो समजला जातो, तो विषय, दामलेसर, कोणतेही पुस्तक - बिस्तक न घेता शिकवत असल्याने, त्यांचा दरारा, दबदबा अधिक होता. दामलेसरांचा अणि माझा स्नेह जुळला तरी एक शिक्षक व विद्यार्थी ही धार त्या नात्याला होतीच, पण ती निघून गेली ती, मी जेव्हा त्यांच्याच महाविद्यालयात त्यांचाच सहाय्यक म्हणून निवडला गेलो व त्यांच्या हाताखाली त्यांच्या मार्गदर्शनासह काम करु लागलो तेव्हा!

मी डिसेंबर १९८३ मध्ये रुपारेलला आलो व दामलेसर डिसेंबर १९८४ मध्ये सेवानिवृत्त झाले. या एक वर्षाच्या कालावधीत मी त्यांच्याकडून भरपूर प्रात्यक्षिक पातळीवरचे शिकलो. त्याचा मला आजही भरपूर उपयोग होतोय, पण दामलेसर निवृत्त झाल्यानंतर मला अनेकदा भेटायचे, रस्त्यात, ग्रंथपालन प्रमाणपत्राच्या वगात, कार्यक्रमांना, इतरत्र पण कधीही त्यांनी मल रुपारेल विषयी विचारले नाही वा माझ्या कार्यात 'सल्ला' नामक ढवळाढवळ केली नाही. ग्रंथालय माझ्या ताब्यात सोपवून ते तिथून जे निघाले, ते परत कोणत्याही प्रकारच्या काळजीने, व्यथित झाले नाहीत. त्यांनी हा जो इतका मोठा विश्वास माझ्यावर टाकला तो मला फार मोलाचा वाटतो.

रुपारेल मधला पहिला दिवस मला चांगलाच आठवतो. माझी रितसर निवड झाल्यावर मी दामलेसरांना विचारायला घरी गेलो की, मी उद्या कोणत्या वेळेत येऊ ?

ते मला म्हणाले, '' तू दहा वाजता ये. मी १२ पर्यंत येणार आहे. मी आल्यावर मग बोलू.''

मला तेव्ह खरं तर त्यांना सांगायचं होतं की, 'पहिलाच दिवस असल्याने मी व तुम्ही बरोबर जाऊ या,' पण माझी जीभ रेटलीच नाही. मी रुपारेलला दहा वाजता येऊन दाखल झालो. जुजबी ओळखी झाल्यावर मी कामास सुरुवात केली, पण नक्की व नेमकं काम काय करायचे ? हे माहीत नसल्याने म्हणून मी उठलो व रुपारेलच्या पुस्तकांच्या कपाटाच्या रागांमध्ये गेलो. पुस्तके पहात गेलो आणि इतका रमलो की मला भानच राहिले नाही. शेवटी एकाने येऊन सांगितले की, ''दामलेसरांनी तुम्हाला बोलावले आहे.'' मी मनात म्हटले, 'चला, सर आले आता काळजी नाही.' मी सरांच्या केबिनमध्ये गेलो.

''या, बसा!'' असं दामलेसर म्हणाले. मी अवघडत त्यांच्या समोर बसलो.

''बोला, काय काम केलंत ?'' दामले सरांच्या प्रश्नाने मी एकदम गांगरलो.

''नाही, तसं नेमकं काही नाही, पण पुस्तकं कोणती आहेत आपल्याकडे ते पहात होतो.'' मी भीतभीत म्हणालो.

या माझ्या कृतीने ते इतके खूष झाली की लगेच

म्हणाले, ''चला, माझी काळजी मिटली. ग्रंथालयाला चांगला माणूस मिळाला. एक सांगतो कर्णिक, ज्याची आपल्या कलेक्शनवर हुकमत असते तो उत्तम लायब्ररीयन होतो. मला तू नेमके काय करतोस ते पहायचे होते व म्हणूनच मी जरा उशीरा आलो.''

दामले सरांच्या रुपारेलमधला शेवटचा दिवसही मला असाच स्मरणात आहे. ३१ डिसेंबर १९८४ रोजी निवृत्त होणार होते व आमचे महाविद्यालयीन ग्रंथपालांचे अधिवेशन कोल्हापूरला असल्याने आम्ही तेथे जाणार होतो व त्या तारखाही त्याच होत्या.

मी त्यांना म्हटले की, ''तुम्ही कसे येणार ! शेवटच्या दिवशी तुम्ही ग्रंथालयात असायला हवे. तुमची सही मस्टरवर व्हायला हवी.'' ते म्हणाले, ''मी एक दिवस आधी निघेन.'' मला हे काही खरे वाटले नाही. ते उगाच बोलत आहेत असं वाटत होतं, पण मी काही बोललो नाही.

३० डिसेंबरला संध्याकाळी दामलेसरांनी बॅग भरली आणि मला म्हणाले, ''मी रात्रीच्या बसने जातो. तू उद्या कोल्हापूर पहा व मग ये.''

मी चक्रावलो. मी त्यांना म्हटलं, ''सर, जाऊ द्या, आपण बरोबर जाऊ. जरा फिरू. बघू इथली ठिकाणं.''

''नको. मला गेलं पाहिजे. शिस्त मोडता येणार नाही. इतकी वर्षे जी पाळली, मला कोणी बोलणार नाही. विचारणार नाही. शिवाय हा सेमिनारही ऑफिशियल आहे. मी ड्युटी लिव्ह घेतली आहे, पण मनाला पटत नाही. मी जातो.'' असं म्हणाले व गेलेही.

मला मात्र आग्रह करून फिरायला लावलं. का, तर मी नवीन होतो. नव्याने या व्यवसायात आलो होतो, तर मी नवनवे अनुभव घेतले पाहिजेत, पाहिलं पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

रात्रीचा प्रवास करून ते दुसऱ्या दिवशी कामावर आले. काम केलं आणि मग निवृत्त झाले.

मागची पिढी ही नैतिकता पाळणारी होती. आजचे बकाळ रुप आलंय, तशी तेव्हा स्थिती नव्हती. मी रुपारेलचा ग्रंथपाल झाल्यावर दामलेसर आमच्या घरी आले. माझं त्यांनी अभिनंदन केलं आणि माझ्या आईला म्हणाले, ''आज माझी जबाबदारी पूर्ण झाली.''

जबाबदारी मानणारी आणि पार पाडणारी ती पिढी होती आणि म्हणूनच दामलेसरांविषयी आमच्या ग्रंथालयातल्या सर्व कर्मचाऱ्यांना अतिशय आदर होता, आपुलकी होती, जिव्हाळा - प्रेम होतं. निवृत्त झाल्यानंतर त्यांनी ग्रंथालयातल्या सर्व कर्मचाऱ्यांना घरी जेवायला बोलवलं, एकेक शर्टाचं कापड दिलं आणि सर्वांचे आभार मानले. वस्तुत: घरी इतका घाट घालायचं तसं कारण नव्हतं, पण त्यांनी तो घातला, कारण त्यांचं आतडं ग्रंथालयातल्या कर्मचाऱ्यांसाठी नेहमीच तुटलं होतं. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अडीअडचणीला दामले सर नेहमी उभे राहिले होते. काही ठराविक रक्कम आमच्या महाविद्यालयाकडे ठेव म्हणून दिली व सांगितले की, यातून येणारे व्याज ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकिय मदतीसाठी वापरावे.

दामलेसरांचे इतरांशी, विशेषत: शिक्षक वर्गाशी चांगलं सूत जमायचं. मला त्यांनी स्टाफ कॉमन रुम मध्ये रोज एकदा तरी जात जा असा सल्ला दिला होता. तो देताना ते म्हणाले होते की, ''तिथे चांगली चर्चा होते, काही विषय निघतात, पुस्तकावर गप्पा होतात, वाचकांच्या म्हणजे मुलांच्या गरजा लक्षात येतात. कॉलेजचे, डिपार्टमेटचे प्लॅन्स समजतात. तिथे जाशील तर तुला फायदा होईल.'' त्यांचे ते मत मला फारच आवडले होते. इतकेच नाही तर अत्यावश्यकही वाटत होते. त्यांचे शिक्षकांशी व व्यवस्थापनाशी चांगला 'टॅपो' होता. त्यांना मानही होता. त्यांनी मांडलेली गोष्ट सहसा टाळली जात नसे.

*नुसतं देवळात जाऊन देव भेटत नाही, त्यासाठी काट्याकुट्यातून प्रदक्षिणा घालावी लागते.*

आमच्या महाविद्यालयाचे सर्वेसर्वा होते प्रा. सी. टी. येवलेकर सर. दामलेसरांना त्यांच्याविषयी आदर तर होताच, पण त्यांनी जे एकमेव पुस्तक प्रसिद्ध केले ते दामल्यांनी येवलेकरसरांना अर्पण केले होते, यावरुन तो आदर किती उच्च पातळीवर असेल याची कल्पना येऊ शकते.

दामलेसर उत्तम शिक्षक होते, चांगले ग्रंथपाल होते व सेवाभावी कार्यकर्ते होते. संघाचे ते काम करत पण त्याबद्दल फारसे बोलत नसत. निवृत्त झाल्यानंतर त्यांना सेवाकार्य अधिक करायचं होतं, मधून मधून त्याबाबत ते बोलत.

दामलेसर रुपारेलला लागले तेव्हा फक्त मॅट्रिक होते. पुढे त्यांनी कष्टाने एम.ए. केलं, ग्रंथालयशास्त्रातील पदवी घेतली. त्यांनी स्वत: बरोबर इतरांनाही घडवलं. श्री. अशोक ठाकूर पुढे ग्रंथपाल झाले. इतरही अनेकजण आहेत की ज्यांनी रुपारेलच्या ग्रंथालयाचा आधार घेतला व दामल्यांनी तो दिला. दामल्यांनी घडवलेली लायब्ररी, त्याची व्यवस्था, ग्रंथसंग्रह इतका मोलाचा आहे की, मला आयतीच सारी साधनसामुग्री मिळाली. दामल्यांच्या कार्याचं योगदान खरंतर केव्हा तरी लिहायला हवंय.

१९८० पासून मी दामल्यांना ओळखतोय पण आपल्या भावी एकाकी आयुष्याची कथा त्यांच्या गप्पात, बोलण्यात कधीच नव्हती. त्या विचाराने ते कधी हवाळदिल झालेले दिसले नाहीत. आहे ते त्यांनी अगदी खिलाडू वृत्तीने स्वीकारलं. नाहीतर मूल नसलेली जोडपी किती ठिसूळ होतात शेवटी शेवटी.

'जेथे जातो तेथे माझी भावंडे आहेत' म्हणणाऱ्या नामवंत केशवसुतांशी, दामल्यांशी, त्यांचे आडनाव बंधूंचे नाते होते ते काही उगाच नाही. हा केशव दामलेही त्याच वृत्तीने जगला. शेवटपर्यंत !

**डॉ. प्रदिप कर्णिक**

मुखपृष्ठावरून

**संपादकीय** **संत साहित्यातील ज्ञानद्वीप**

'माझी वाचा आणि वाणी
गेली म्हणाल अंत:करणी
परी मी आहे जगतजीवनी । निरंतर ॥
आत्माराम दासबोध
माझे स्वरूप स्वत:सिद्ध
असता न करावा खेद । भक्तजनी ॥

अशा आत्मविश्वासपूर्वक शब्दांत त्यांनी निरवानिरल केली.

समाजावर असणाऱ्या प्रेमापोटी त्यांनी हा साहित्य प्रपंच थाटला. अनेक मोठमोठी विद्वान माणसे आपले विचार शब्दांत लिहून ठेवत नाहीत, ते त्यांच्याबरोबर संपतात. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी या अप्रकट विचारांना 'पराधीन सरस्वती' म्हटले होते. सरस्वती हे शब्दांचे मूळ आहे. सर्व ज्ञान शब्दांतून व्यक्त केले जाते व हे चिंतन व्यक्त झाले तरच समाजाला त्याचा उपयोग आहे. हे रामदासांनी जाणले होते. या विचारांत समाज संघटनेच्या शक्यता आहेत हे त्यांना ठाऊक होते. निद्रिस्त समाजासाठी गुळगुळीत भाषा उपयोगाची नाही. हे ही त्यांनी ओळखले होते. म्हणूनच संजीवनी देईल असे तेज त्यांच्या शब्दांना लाभले.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जे करील तयाचे

असे स्पष्टपणे ते सांगतात. आनंदभुवन निर्माण करण्याची प्रेरणा शिवाजी महाराजांना देतात. त्यासाठी ५९ तेजस्वी ओव्या लिहितात.

समाज संघटन हे ध्येय असल्यानेच मठ आणि मंदिरांचे कालसुसंगत माध्यम समर्थांनी वापरले. त्यांच्या चारशेव्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे अनेक बाबतींतील वेगळेपण लक्षात घेतले जावयास हवे. कारण संत साहित्याच्या सागरातले हे बेट ज्ञानाचे बेट होते !

*सुख त्यागात आहे, पण तो त्याग अंधळा असता कामा नये.*

**साहित्य जगत**

# ग्रंथकल्याणी

सार्वजनिक वाचनालयाने (शिवाजी चौक कल्याण- प. जि. ठाणे) शतकोत्तर रौप्यमहोत्सव दोन-तीन वर्षांपूर्वी साजरा केला. (आता १३० व्या वर्ष्याकडे त्याची वाटचाल चालू आहे व त्या वर्षाचा स्वागत समारंभ भव्य प्रमाणात साजरा होणार आहे) ३-२-२००८ रोजी ग्रंथकल्याणी हा सुंदर ग्रंथ वाचनालयाने (पृ २२० मूल्य रु. २५०/-) प्रसिद्ध केलेला आहे.

महाराष्ट्र राज्यात ग्रंथालयाची परंपरा जुनी आहे. महाराष्ट्र सरकारने ६ मार्च २००६ रोजी एक निर्णय घेतला आहे व त्यान्वये राज्यातील १०० वर्षे व त्यापेक्षा जास्त वर्षे झालेल्या ग्रंथालयांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकी पाच लाखांचे विशेष अनुदान देण्याचे ठरविले आहे. ह्या विशेष अनुदानास पात्र ठरलेली महाराष्ट्रांत ७७ ग्रंथालये आहेत. त्यांपैकी एक आहे कल्याणचे सार्वजनिक वाचनालय.

या ग्रंथाचे लेखक आहेत प्रशांत वसंत मुल्हेरकर. व प्रा. जितेंद्र भामरे त्यांनी मोठी मेहनत घेऊन या ग्रंथालयाचा (वाचनालयाचा) इतिहास या ग्रंथात सांगितलेला आहे. या इतिहासाबरोबरच त्यांनी जागतिक ग्रंथालय चळवळीचीही माहिती दिलेली आहे. एकूण २३ प्रकरणे या ग्रंथात आहेत. त्यामध्ये पृथ्वीतलावर मानवाची निर्मिती झाल्यापासून चित्रलिपीचा उदय कसा झाला व त्याद्वारे एक जण दुसऱ्या व्यक्तीला आपल्या मनातील भावना कसा सांगायचा? नंतर इजिप्त व असिरीया आणि बबिलोनिया या नद्यांच्या खोऱ्यात राहणाऱ्या मानवाने दगडविटांवर ग्रंथ कसे कोरून लिहिले भारतात लिप्या कशा तयार झाल्या, जगातल्या ग्रंथालय चळवळी आणि प्रस्तुत कल्याण सार्वजनिक वाचनालयाचा समग्र इतिहास इ. मौलिक माहिती दिलेली आहे.

या ग्रंथासाठी लेखकांनी मोठी मेहनत घेतलेली आहे. एकंदरीत, हा सारा इतिहास वाचनीयच नव्हे तर स्फूर्तिदायकही आहे. म्हणून, प्रत्येक मराठी वाचकाने आपल्याला शक्य असेल ते योगदान अशा चळवळींसाठी द्यावे.

**शरद जोशी (ग्रंथप्रसारक)**

दि
शा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

*अयशस्वी माणसे तक्रारखोर असतात.*

# परिसरवार्ता

## आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम

**✦ इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २००७ :**

१००% निकाल

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | ०६ | ०६ |
| ८ वी | ११ | ११ |
| १० वी | २५ | २५ |
| एकूण | ४२ | ४२ |

सर्वांत जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | निकाल-ठाणे जिल्हातील गुणवत्ता यादीत |
|---|---|---|
| ५ वी | सन्मय अघारकर | ३ रा |
| ८ वी | मुस्तफा करी | २ रा |
| १० वी | रुचा कारखानीस | १ ली |
| | विराज संघवी | २ रा |

**✦ डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २००८ चा निकाल :**

खालील विद्यार्थ्यांना रजत पदक मिळाले.

१. कु. नेहा पुसाळाकर ६ वी

२. कु. रुचा ठकार ९ वी

## जोशी बेडेकर महाविद्यालय

दि. ११/२/०८ ते दि. १०/०३/०८ या कालावधीत झालेले कार्यक्रम.

✦ दि. १२ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाच्या 'संशोधन व संदर्भ' विभागाचे उद्‌घाटन डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले.

✦ दि. १४ फेब्रुवारी रोजी 'आत्मसंरक्षण' या विषयावर आधारित जिमखाना विभागातर्फे एक अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. कराटे प्रशिक्षक श्री. ईशान आर्यन यांनी आणीबाणीच्या किंवा संकटाच्या परिस्थितीत आत्मरक्षण कसे करावे, यासंबंधी प्रात्यक्षिके करून दाखवली. त्या प्रात्यक्षिकांमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला.

✦ दि. १६ फेब्रुवारी रोजी 'व्याससभा' या उपक्रमांतर्गत 'Role of husband in family' या विषयावर सर्व प्राध्यापकांनी चर्चा केली.

✦ दि. २३ फेब्रुवारी रोजी 'व्याससभा' या उपक्रमात 'Violence in society' या विषयावर सर्व प्राध्यापकांनी चर्चा केली.

✦ दि. २७ फेब्रुवारी रोजी सुप्रसिद्ध गायिका सौ. विभावरी बांधवकर यांचे 'संगीतमय व्याख्यान' प्राध्यापक - कक्षात खास प्राध्यापकांसाठी आयोजित करण्यात आले होते. प्रमुख अतिथींनी उपस्थित प्राध्यापकांना संगीताचे काही मूलभूत धडे दिले. त्यानंतर प्राध्यापकांच्या गीतगायनाचा कार्यक्रम रंगला. याप्रसंगी प्राध्यापकांसाठी संगीत प्रशिक्षणाचे आयोजन करण्याचा मानस प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांनी व्यक्त केला.

✦ दि. २९ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण पाहण्याची संधी डॉ. विजय बेडेकर यांनी सर्व प्राध्यापकांना

उपलब्ध करून दिली. महाविद्यालयाच्या 'कात्यायन' सभागृहात हा कार्यक्रम झाला.

✦ दि. १ मार्च रोजी 'व्याससभा' या उपक्रमांतर्गत 'Transforming Work Culture' या विषयावर सर्व प्राध्यापकांनी चर्चा केली.

✦ दि. ८ मार्च रोजी 'जागतिक महिला दिनाचे' औचित्य साधून महाविद्यालयाच्या 'Women's Cell' तर्फे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या उच्च पदांवर कार्यरत असणाऱ्या समस्त महिला वर्गाचे - अर्थात प्राचार्य डॉ. शकुंतला सिंग, उपप्राचार्या डॉ. पद्मिनी मूर्ती, सौ. लीला भट, उपप्राचार्य (कनिष्ठ महाविद्यालय) सौ. बेके व पर्यवेक्षिका सौ. तिरमारे यांच्या सत्कार सौ. सुमेधा बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आला. प्रमुख अतिथींनी या प्रसंगी काव्य स्वरूपात प्रबोधनपर भाषण केले. त्यानंतर वरील सर्व मंडळींच्या मुलाखतीचा कार्यक्रम रंगला.

## वि.प्र.मं. चे ठाणे महापालिका विधी महाविद्यालय

✦ **मराठी दिन :**

दिनांक २३ फेब्रुवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयात मराठी दिनाचे औचित्य साधून 'मराठीतून कायद्याचे शिक्षण' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता.

महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संकल्पना थोडक्यात स्पष्ट केली. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व शैक्षणिक व व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. श्री. विजय घोरमाडे उपस्थित होते. सरांनी त्यांच्या भाषणात सद्यस्थितीचा आढावा घेतांना मराठीतून कायद्याचे शिक्षण घेतल्यास कायद्याच्या शिक्षणाला आणि त्यानंतर प्रत्यक्ष व्यवसायाला पूर्णपणे न्याय देता येणार नाही असे प्रतिपादन केले. परंतु पुढे येणाऱ्या काळात कदाचित ते शक्य होईल असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व मराठी भाषा संरक्षण व विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्री. शांताराम दातार यांनी मराठीतून कायद्याचे शिक्षण असायलाच हवे असे ठाम मत व्यक्त केले तरच आपण त्यात येणाऱ्या समस्या व अडचणी सोडवू शकू असे विचार व्यक्त केले.

परिसंवादात शिक्षकांच्या वतीने महाविद्यालयातील जेष्ठ प्रा. सौ. जान्हवी नवरे यांनी याबाबतीत विद्यार्थ्यांना पुढील व्यवसायिक आयुष्यात येणाऱ्या अडचणींकडे लक्ष वेधले तर सौ. आशा दातार यांनी मराठीतून कायद्याचे शिक्षण तर घ्यायचे आहे, परंतु त्यातील अडचणींना सामोरे कसे जायचे ? असे विविध प्रश्न मान्यवरांपुढे उपस्थित केले.

याचवेळी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी मराठीत द्वितीय वर्ष प्रात्यक्षिक परीक्षेसाठी मूळ इंग्रजी स्वरूपातील अभ्यास साहित्याची अनुवादित केलेली प्रतही प्रकाशित करण्यात आली.

प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांच्या मार्गदर्शनानुसार कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. जान्हवी नवरे व विद्यार्थी परिषद यांनी विशेष मेहनत घेतली.

✦ **डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा १६-२-२००८ :**

दिनांक १६ फेब्रुवारी रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या विधी महाविद्यालयात तिसरी डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती वादविवाद स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेसाठी -

1) Ratification of treaties shall be only with prior approval of the parliament.

2) Requirement of one year waiting period

for divorce petitions is Unconstitutional.

3) Parliamentary democracy is unsuitable for India.

हे विषय ठेवण्यात आलेले होते.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून माजी न्यायाधीश ॲड. श्री. अर्जुनवाडकर आणि निवृत्त न्यायाधीश श्रीयुत दास हे लाभले होते. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे प्रतिनिधी म्हणून कार्यकारिणी मंडळाचे जेष्ठ सभासद श्री. करंदीकर उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच यापेक्षा उत्तम प्रतिसादाची अपेक्षा व्यक्त केली. इतर अनेक मान्यवरही कार्यक्रमाला उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांनी स्पर्धे मागचा हेतू स्पष्ट केला.

आपले मनोगत व्यक्त करताना परीक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतानाच विषयाच्या परिपूर्ण मांडणीसाठी विषयासंदर्भात सखोल संशोधनाची आवश्यकता असल्याचे सांगितले.

या स्पर्धेच्या अनुषंगाने सौ. शैलेश वेंगुर्लेकर यांचे 'समुदायाशी संवाद साधण्याची कला' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. अरुण जालीसादगी व सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार यांचे त्यासाठी मार्गदर्शन लाभले.

## वि. प्र. मं. चे तंत्रनिकेतन

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, दिवाळी प्रथम सत्र व तृतीय सत्र - २००७ चे निकाल नुकतेच जाहीर झाले असून वि.प्र.मंडळाच्या तंत्रनिकेतनामधील अव्वल




क्रमाकांने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे (अभ्यासक्रमा प्रमाणे) खालील प्रमाणे -

**प्रथम सत्र**

| अभ्यासक्रम | विद्यार्थ्यांचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| IE | प्रभू, अक्षता नरसिंहा | 91.45% |
| IF | अग्रेसर, स्नेहल नितीन | 88.14% |
| MU | चव्हाण, नीलम दत्ताराम | 86.21% |
| CO | राणे, तेजस प्रमोद | 85.66% |
| EPS | अय्यर, श्रीराम सुभ्रमण्यम | 84.14% |
| CH | कोयंडे, हर्षद दिलीप | 68.41% |
| IS | पाटील, अवधूत सुरेश | 78.21% |
| CP | प्रभू, नमिथा नरसिंहा | 81.44% |
| IT | ओसवाल, प्रवीण मंगीलाल | 75.6% |

**तृतीय सत्र**

| | | |
|---|---|---|
| IE | ओसवाल, प्रवीण | 83.13% |
| CH | वाघमारे, अभिजीत | 90.58% |
| IF | अबनवे, महेश | 90.46% |

| | | |
|---|---|---|
| MU | खोत, सुजाता | 76.00% |
| CO | सांगलीकर, अनिषा | 90.00% |
| IS | सूर्यवंशी, सूरज | 72.13% |
| EPS | महाशब्दे, गौरव | 78% |

वरील विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतनतर्फे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी याच्यातर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

**✦ CHEM X PERT ( 2007 - 2008) या राज्य स्तरीय शोध निबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन:**

तंत्रनिकेतनच्या केमिकल इंजिनिअरिंग शाखेने राज्यस्तरीय शोध निबंध सादरीकरण स्पर्धा आयोजित केल्या होत्या. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई हे ह्या स्पर्धेचे प्रमुख आश्रयदाते होते. ही स्पर्धा दि. १६ फेब्रुवारी रोजी तंत्रनिकेतनच्या दृक्‌श्राव्य कक्षात पार पडली. स्पर्धेचे उद्‌घाटन श्री. पी. एन. जुमले (डायरेक्टर, BOAT) ह्यांनी केले. प्रा. डी. एन. शिंगाडे (सेक्रेटरी, INSBTE, मुंबई) हे या प्रसंगी उपस्थित होते.

स्पर्धेत एकूण १८ शोधनिबंध महाराष्ट्रातील विविध तंत्रनिकेतनांमधून आलेल्या ३८ विद्यार्थ्यांनी सादर केले. श्री. शैलेश परांजपे, मॅनेजर, टोयो इंजिनिअरिंग आणि डॉ. डी. एस. भातखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

विजेत्या ठरलेल्या खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | पारितोषिके |
|---|---|---|
| १. | श्री. कौशल आर. शेट<br>श्री. करण बी. फिट्राट्रा<br>(श्री. भागुबाई मफतलाल पॉलिटेक्नीक, मुंबई) | प्रथम |
| २. | श्री. तुषार देवाडिगा<br>श्री. अमेय ओक<br>श्री. पियुष वर्मा<br>(VPM'S तंत्रनिकेतन, ठाणे) | द्वितीय |
| ३. | श्री. हितेंद्र सिंग<br>श्री. मिहिर पंड्या<br>(VPM'S तंत्रनिकेतन, ठाणे) | उत्तेजनार्थ |



**प्रथम पारितोषिक वितरण करताना मा. प्रा. डी. एन. शिंगाडे (सेक्रेटरी, MSBTE मुंबई) सोबत प्राचार्य डी. के. नायक वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे व पारितोषिक विजेते विद्यार्थी**

वरील विजेत्या विद्यार्थ्यांना MSBTE ने घोषित केलेली पारितोषिके देण्यात आली.

**✦ प्रशिक्षण :**

वि. प्र. मंडळाच्या, तंत्रनिकेतनच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम आणि इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाने व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या सहकार्याने Content

Updating training program on "safety & soft skill Awareness for supporting staff" व Embedded system introduction & application for teaching staff ह्या विषयीचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. २५ ते २९ फेब्रुवारी पर्यंत ९.१५ ते १.०० या वेळी हा कार्यक्रम होता. प्रशिक्षण कार्यक्रम तंत्रनिकेतनच्या दृक्श्राव्य कक्षात पार पडला. डॉ. अजय देशमुख प्रिंसिपॉल सरस्वती इंजिनिअरिंग कॉलेज, पालघर, यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी बहुसंख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**✦ प्रथम क्रमांक :**

दि. १६ फेब्रुवारी रोजी के. के. वाघ पॉलिटेक्नीक, नाशिक येथे राज्य स्तरीय शोधनिबंध सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. त्यात वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इलेस्ट्रिकल पॉवर सिस्टिम या शाखेतील तृतीय वर्षातील मंगेश ढवळे व प्रशांत कुलकर्णी या दोन विद्यार्थ्यांच्या रिनिव्हीएबल एनर्जी सोर्सेस या शोधनिबंधाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. राज्यभरातून सुमारे ५० विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले. सध्याच्या स्थितीत उर्जा समस्येची सर्वच राष्ट्रांना जाणीव निर्माण झालेली असून उर्जा निर्मितीचे जे स्त्रोत आहेत त्यांची कमतरता जाणवत असून अशा परिस्थितीत पर्यायी उर्जेशिवाय गत्यंतर नाही. अशा तऱ्हेचे अभ्यासपूर्ण विवेचन विद्यार्थ्यांनी सादर केले.

ह्याच विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेली राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सुद्धा प्रथम पारितोषिक पटकावले होते.

तृतीय वर्ष इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विद्यार्थी जयंत आपटे, संकेत पाटील आणि सागर सोमण यांचा प्रकल्प 'Virtual insrumentaion using Lab view platform' ची 'बिर्ला इंडस्ट्रियल आणि टेक्नॉलॉजीकल म्युझिअम' ने आयोजित केलेल्या Innovation Hub या प्रदर्शन आणि प्रकल्प स्पर्धेसाठी निवड झाली. हे प्रदर्शन INFOCOM 07 - 08 (कोलकत्ता) या माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील बड्या उद्योजकांच्या प्रदर्शनाचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आले होते. प्रकल्पाच्या मार्गदर्शिका म्हणून इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. किर्ती आगाशे होत्या. हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावरील निवड प्रक्रियेअंती निवड करण्यात आलेल्या तीस प्रकल्पापैकी एक आहे हे विशेष.

**✦ 'VENTURA' प्रदर्शनात केमिकल इंजिनियरिंगच्या प्रोजेक्टला प्रथम पारितोषक :**

दि. २७ व २८ फेब्रुवारी या दिवशी भारती विद्यापीठ इंस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी (BVIT), खारघर आयोजित 'VENTURA' - २००८ प्रोजेक्ट प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या प्रदर्शनात तंत्रनिकेतनच्या केमिकल इंजिनियरिंगचे (तृतीय शाखा) विद्यार्थी हितेंद्र सिंग व मिहिर पंड्या यांच्या 'Water Treatment Trial by CACCO process' या प्रोजेक्टला प्रथम पारितोषिक मिळाले.



**हितेंद्र सिंग**




**मिहिर पंड्या**

वरील विद्यार्थ्यांचे तंत्रनिकेतन तर्फे अभिनंदन.

वृत्त संकलन - **श्री. चंद्रकांत शिंगाडे**

# विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर

विपत्तीमध्ये तू माझ रक्षण कर, ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये, एवढीच माझी इच्छा.
दु:खतापान व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा
माझ्या मदतीला कोणी आल नाही
तर माझ बळ मोडून पडू नये, एवढीच इच्छा.
जगात माझ नुकसान झाल,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझ मन खंबीर रहावं, एवढीच माझी इच्छा.
माझ तारण तू करावस, मला तारावस ही माझी प्रार्थना नाही.
तरुन जाण्याच सामर्थ्य माझ्यात असाव एवढीच माझी इच्छा.
माझ ओझ हलक करून
तू माझ सात्वन केल नाहीस तरी, माझी तक्रार नाही.
ते ओझ वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी, एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा, दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा.



गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

- ३०० आसनांची व्यवस्था
- आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा
- उपाहाराची व्यवस्था
- वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
- प्रसन्न वातावरण

संपर्क
कार्यवाह,
विद्या प्रसारक मंडळ,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.